शनिवार, २६ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 26 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-29 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# दुष्काळाचा अहवाल त्वरित सादर करा

## कृषीमंत्री धनंजय मुंडे : केंद्रीय पातळीवरही पाठपुरावा करणार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळ सदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी शुक्रवारी विभागीय आयुक्त कार्यालयात मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांच्या पीक पाणी व पावसाच्या एकूण परिस्थितीचा आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी, पशुधन वाचविण्यासाठी चाऱ्याचे नियोजन करण्यासोबतच आठही जिल्हाधिकाऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीबाबत तालुकानिहाय आढावा घेत शासनास अहवाल सादर करावा. दुष्काळाची दाहकता लक्षात घेता आतापासून नियोजन महत्त्वाचे आहे. टंचाई स्थिती असली तरी काळजी करू नका, शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे, असा विश्वास कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिला. मराठवाडयातील परिस्थितीबाबत सात दिवसाच्या आत महसूल, कृषी व विमा कंपन्यांचे प्रतिनिधी यांनी पंचनामे करावेत, असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.**



विभागीय आयुक्त कार्यालयात शुक्रवारी कृषीमंत्री मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी संदीपान भुमरे, अतुल सावे बैठकस्थळी तर व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे अनिल पाटील, तानाजी सावंत, गिरीश महाजन, संजय बनसोडे उपस्थित होते. कृषी आयुक्त सुनील चव्हाण, मधुकरराजे अर्दड, आस्तिककुमार पाण्डेय, डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ, रघुनाथ गावडे, दीपा मुधोळ-मुंढे, वर्षा ठाकुर-घुगे, अभिजित राऊत, डॉ. सचिन ओंबासे, जितेंद पापळकर हे बैठकीत सहभागी झाले होते.

कृषीमंत्री मुंडे म्हणाले, मराठवाड्यात दुष्काळ प्रवण भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व परिस्थिती नियोजनपुर्वक हाताळण्यासाठी आजची बैठक महत्त्वाची आहे. मराठवाडयातील बहुतांश मंडळात पावसाचा मोठा खंड आहे. पर्जन्यमापक यंत्र आहे त्याठिकाणी पाऊस झाला तर मंडळात पाऊस आहे, असे दिसत असले तरी परिस्थिती मात्र वेगळी आहे. त्यामुळे याबाबत गावशिवारातील परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल. केंद्रिय पातळीवरही याबाबत शासन पाठपुरावा करणार आहे. कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

शूधनाचीही सर्वतोपरी काळजी घेण्यात येईल. पशुधनाला पुरेसा चारा उपलब्ध होण्यासाठी कृषी विभागाने चारा लागवडीचे नियोजन करावे. दुष्काळी परिस्थिती जरी वाढली तरी कोणत्याही परिस्थितीत चारा टंचाई निर्माण होणार नाही, ही बाब गांभीर्यपूर्वक विचारात घेत चारा लागवडीचे क्षेत्रनिहाय नियोजन करावे. सद्यस्थितीत काही भागात सक्तीने कर्जवसुली सुरू असून ही सक्तीची कर्जवसूली तातडीने थांबवा, खरिप कर्जाचे पुर्नगठन करण्याबाबत मंत्रीमंडळ बैठकीत प्रस्ताव मांडण्यात येईल, असेही मुंडे म्हणाले. पिण्याच्या पाण्याबाबत टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेत टँकरबाबतची निविदा प्रक्रिया लवकरच पुर्ण करत गरज आहे त्या ठिकाणी टँकर देण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी यंत्रणेला दिल्या.

### महत्त्वाची बातमी

## त्या नऊ आमदार, दोन खासदारांवर कारवाई करावी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीच्या नऊ आमदारांनी भाजपसोबत जाऊन शपथ घेतली आणि मंत्रीपदे मिळवली तर दुसरीकडे राष्ट्रवादीत कोणतीही फूट पडली नसल्याचे खासदार सुप्रिय सुळे म्हणतात, त्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना नेमकं काय चाललंय हे लक्षात येत नसताना आता आणखी एक मोठी माहिती समोर येत आहे. राष्ट्रवादीतील ज्या नऊ आमदारांनी पक्षाच्या विरोधात जाऊन मंत्रीपदाची शपथ घेतली, आणि ज्या दोन खासदारांनी त्यांना साथ दिली त्यांच्यावर आता कारवाई करावी अशा मागणीचे पत्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून विधिमंडळाचे अध्यक्ष आणि लोकसभेच्या सभापतींना देण्यात आले आहे. अनुसूची 10 प्रमाणे नऊ आमदार आणि दोन खासदारांवरती अपात्रतेची कारवाई करा अशी मागणी त्यांनी केली आहे. पण त्यांना दिलेल्या नोटिसीला अद्याप उत्तर दिलेले नाही. पक्षाच्या वतीने अजित पवार गटाने शरद पवार गटाला एक नोटिस पाठवली होती. त्यावर अद्याप शरद पवार गटाकडून उत्तर देण्यात आलं नाही. पण यासाठी किती कालावधी लागू शकतो याची कल्पना नाही, त्यामुळे या आमदारांवर कारवाई सुरू करा अशी मागणी शरद पवार गटाकडून करण्यात आली आहे. अजित पवारांबद्दल शरद पवार यांनी आणखी एक मोठं वक्तव्य केलंय. एखादा मोठा गट फुटला तर त्याला फूट म्हणतात. आमच्यातल्या काही लोकांनी वेगळी भूमिका घेतली, त्याला फूट म्हणता येणार नाही. पहाटे शपथविधी झाला. त्यावेळी आम्ही त्यांना संधी दिली होती, आता परत संधी द्यायची नसते आणि मागायची देखील नसते, असे पवार म्हणाले.

## महाराष्ट्राला अजित पवार रिटर्न्स पार्ट-२ पहायला मिळेल : अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या विधानावरून राजकीय चर्चा सुरु झाली आहे. शरद पवार यांच्या विधानाचा सरळसरळ अर्थ असा लावला जाऊ शकतो की महाराष्ट्राला व देशाला अजित पवार रिर्टन्स पार्ट-२ पहायला मिळू शकतो, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, "कोणत्याही परिस्थितीत भाजपाबरोबर जाणार नाही, 'इंडिया' आघाडी बरोबरच राहणार आहे", असे शरद पवार यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्याचा वेगळा अर्थ काढण्याची गरज वाटत नाही. परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार व त्यांच्याबरोबर सत्तेत सहभागी झालेले त्यांचे सहकारी शरद पवार यांच्या पाया पडतात याचा अर्थ असा आहे की भाजपाने जी राजकीय घाण केली आहे त्याचे उत्तर अजित पवार रिटर्न्सने मिळू शकते. भारतीय जनता पक्षाने तोडफोडीचे राजकारण करत विरोधी पक्ष फोडण्याचे पाप केले आहे. भाजपाने आधी उद्धव ठाकरे यांची शिवसेना फोडून महाविकास आघाडीचे सरकार पाडले व कटकारस्थान करून एकनाथ शिंदे यांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. सरकार स्थापन केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबरोबरही तेच केले पण राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे सक्षम व राजकारणाचा दांडगा अनुभव असलेले नेते आहेत. अजित पवार यांच्या गटाला अद्याप अधिकृत मान्यता मिळालेली नाही. शरद पवार यांचे राजकारण पाहता भारतीय जनता पक्षाला ते कात्रजचा घाट दाखवतील, असेही अतुल लोंढे म्हणाले.



## हदगावातील रस्त्याला आले तलावाचे स्वरूप


आधुनिक केसरी न्यूज

**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** शहरातील मुख्य रस्त्यावर पाणी साचल्यामुळे रस्ता खराब झालेला असून वाहणारे सांडपाणी साचल्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना व पायी चालणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील मुख्य बाजारपेठमध्ये जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून रस्त्यावर सांडपाणी साचून ते रस्त्यावर येत आहे. याच रस्त्यावर हनुमान मंदिर आहे. येणारे भाविक भक्त हनुमानाच्या दर्शनासाठी मंदिरात रोजच दर्शनासाठी पायी येताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या सततच्या पावसामुळे या खड्ड्यांचे मोठे डबके निर्माण झाले आहे. या डबक्यांतून वाहन पुढे नेण्यासाठी वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रोडवर सर्वत्र पडलेल्या खड्ड्यात पाणी साचल्यामुळे वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे या खड्ड्यांत वाहने आदळत असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून या रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी होत आहेत.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

माझ्या कॉलेजमधील विद्यार्थी सुद्धा एवढ्या उत्सुकतेनं ऐकत नाहीत. आपल्या भारतीय संस्कृतीची त्यांना आपण जी ओळख करून देतो आहोत, ती उद्याची पायाभरणी आहे. जी मुलं पुढे चालून भारताची भावी नागरिक होणार आहेत, त्यांना आपला प्राचीन समृद्ध वारसा माहित असायलाच हवा. मोठी झाल्यावर ही मुलं आपल्या संस्कृतीचा अभिमान तर बाळगतीलच पण तो जोपासतील आणि वाढवतील ' भगवानराव म्हणाले. 'अगदी बरोबर आहे भगवान, ' श्यामराव म्हणाले. भगवानराव मुलांकडे वळून म्हणाले, ' बाळांनो, मागील वेळी भारतीयांना धातुशास्त्राची किती प्राचीन काळापासून माहिती होती ते मी सांगितलं होतं. दिल्लीतील मेहरौली येथील गरुडस्तंभाची पण मी माहिती दिली होती.' 'भारत प्राचीन काळापासून किती स्वयंपूर्ण होता याची माहिती केवळ मी सांगतो आहे म्हणून खरी मानू नका. भारतात इंग्रजांची सत्ता स्थिरस्थावर होण्याच्या सुमारास असताना काही इंग्रज, फ्रेंच, स्कॉटिश इतिहासकार भारतात येऊन गेले. काही इंग्रज अधिकारी भारतात राहिले. त्या सगळ्यांनी जे काही आपल्या देशाबद्दल सांगितले आहे, त्याची माहिती मी तुम्हाला देणार आहे. खरे म्हणजे ही माहिती शाळा कॉलेजच्या पुस्तकांमधून सांगितली गेली पाहिजे. पण आजवर या महत्वाच्या गोष्टीकडे तसे दुर्लक्षच होत आले आहे. पण सध्याची परिस्थिती मात्र मला जरा आशादायक वाटते. काही वर्षांनी हे चित्र नक्कीच बदलेल. काय श्याम, तुला काय वाटते ? अरे अगदी बरोबर आहे. शैक्षणिक धोरणात बदल होत आहे. आणि पुढील काळात या गोष्टी इतिहासाच्या पुस्तकात यायला हरकत नाहीत असं मलाही वाटतं, ' श्यामराव म्हणाले' तर बाळांनो, भगवानराव म्हणाले, आपण भारतात दीर्घकाळ राहिलेल्या एका इंग्रज अधिकाऱ्यापासून सुरुवात करू. हा अधिकारी भारतात अनेक वर्षे राहिला. त्याने आपल्या येथील वास्तव्यात जवळपास आपला सगळा देश फिरून पालथा घातला. आणि त्याला ज्या काही गोष्टी कळल्या, त्या त्याने लिहून ठेवल्या एवढेच नव्हे तर तो जेव्हा इंग्लंडला परत गेला, तेव्हा त्याने तेथील पार्लमेंटसमोर भारतासंबंधी ज्या काही गोष्टी मांडल्या, त्या आपल्याला अभिमान वाटावा अशाच आहेत. २ फेब्रुवारी १८३५ या दिवशी त्याने हे भाषण दिले. ' अहो काका, पण तो इंग्रज अधिकारी कोण होता ? त्याचं नाव तरी सांगा ना ! पिंकी म्हणाली. ' अरे हो, त्याचं नाव सांगायचं राहिलंच. त्याचं नाव होतं थॉमस मेकॉले. हा मी कॉलेज विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञ होता.



समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

## वस्तूंची वैधता तपासून घ्यावी

आधुनिक केसरी

अनेकजणांना स्वतःच्या आजारपणामुळे घ्याव्या लागत असलेल्या औषधांची नावे, ती घेण्यामागील कारणे, त्यांतील प्रमुख घटक ह्यासंबंधी काहीच माहित नसते. त्या संबंधीचा आपला अभ्यास असावा ही बाब योग्यच आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

म्हणून आपण स्वतःच्या अभ्यासातून औषध कोणते घ्यायचे, हे अजिबातच ठरवायचे नाही. परंतू डॉक्टरांनी आपल्याला दिलेल्या औषधांची जुजबी माहिती असण्याचा उपयोग इमर्जन्सीच्या वेळी निश्चितच होऊ शकतो. पण औषधे विकत घेताना त्यांची वैधता, किंमत इत्यादी आपण तपासून घेत नाहीत. घरात शिल्लक राहिलेली औषधे

फारशी वापरलीच गेली नाहीत, ती वापरण्यापूर्वी त्यांची वैधता आपण पाहत नाहीत. अनेकदा खाण्याच्या परंतू नाशवंत वस्तू, काही पदार्थ ठराविक कालावधीतच वापरून संपवावे लागतात. अशा नेहमी न लागणाऱ्या वस्तूंची वैधता तरी त्या खायच्या, वापरायच्या अगोदर आपण नीटपणे काळजीपूर्वक तपासून पाहत नाहीत. आपल्या दैनंदिन जीवनांत अनेकदा विविध कारणास्तव निरनिराळे अर्ज, माहितीपत्र, बँकांचे के वाय सी, कर्जाच्या संदर्भातील, घर खरेदीच्या वेळी बिल्डर्स बरोबर करावे लागणारे करारनामे, अनेक कायदेशीर प्रक्रियेत पूर्तता करण्यासंबंधीची कागदपत्रे अशा अनेकविध कागदपत्रांवर आपण स्वाक्षरी करण्याअगोदर त्यांचे पूर्ण वाचन, सखोल अभ्यास करत नाहीत. बँकांचे, इन्शुरन्स कंपन्यांचे सर्वच कागद, अगदी काहीवेळा तर काहीही न लिहिलेले कोरे कागद देखील करारनाम्याच्या नावाखाली डोळेझाक करून, अतिविश्वास ठेवून अथवा गरजेपोटी स्वाक्षरी

करून आणि त्याची कोणतीही स्थळप्रत, कॉपी आपल्याजवळ संदर्भासाठी न ठेवता आपण संबंधिताकडे जमा करत असतो. आपल्या अभ्यासाच्या अभावामुळे आणि आभासी दुनियेच्या आकर्षणामुळे भविष्यात आपल्यावरच पश्चात्तापाची वेळ येऊ शकते.



आधुनिक केसरी

**स्थितप्रज्ञ ध्यान | चिंतामणी ||**
निंदक नी भाट | दोन्हीही घातक ||
विषाचे रूपक | ओळखावे ||
वरपांगी माया मने द्वेष भाव
त्यापरी गाढव | बरे देवा ||२||
असंगाशी संग | घडु नये कधी ||
एकांताची संधी | टाळू नये ||३||
ज्ञानियांच्या द्वारी | व्हावे रे याचक ||
टाकतील भीक | प्रसाद तो ||४||
संतांचे विचार | कल्पवृक्ष जाण ||
स्थितप्रज्ञी ध्यान | चिंतामणी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


यच्च क्षीणमसामर्थ्यं समर्थं कृपया भवेत् |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७५ || जे क्षीण किंवा अशक्त असेल, ते तुझ्या कृपेने सशक्त व्हावे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जागत सोवत नाम में, ऊठत बैठत नाम ।
चलत फिरत रह नाम में, करत धरत रह नाम
।।१४।।(स्वर्वेद पंचम मण्डल षोडश अध्याय)
०५/१६/१४
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
संतजन जागता-झोपता, उठता-बसता, चालता-फिरता किंवा कुठलेही काम करतानाही सदैव नामाचे( परमेश्वराचे ) सुमिरन ( आंतरिक स्मरण ) करतात.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

..............................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी





सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


माया देखील कल्पनेचाच भाग आहे पण आपण स्वानंदघन आत्मस्वरूप आहोत हा अनुभव आल्यावर आपण कल्पनेच्या पलीकडे आहोत याची खात्री पटते. जो स्वतः निर्विकल्पच आहे त्याला माया दुःख देत नाही म्हणून सतत आत्मज्ञानाचा विचार करावा.

जेव्हा आत्मप्रचीति येते तेव्हा स्वस्वरूप ओळखता येते. चार देह म्हणजे सगळा द्रुष्य प्रपंच त्यांचा अंत म्हणजे, माया जन्माच्या मुळाचे स्थान म्हणजे अविद्या आणि या सगळ्यापासुन वेगळे रहाणे अलिप्त असणारा तोआत्मा तो तूच आहेस. ज्यांना द्रुढनिष्ठा असते त्याला आत्मदर्शन खात्रीने घडते.गति--आधोगति,सदगति, दुर्गति यांच्या पासुंन आत्मा निराळा रहातो.

## प्रपंच हे परमार्थाचे साधन

आधुनिक केसरी

फार दिवस नोकरी केली की माणसाच्या मनाला गुलामगिरीची सवय लागते; हे चांगले नाही. काही दिवस तरी माणसाने मालकीहक्काने राहायला शिकले पाहिजे. नोकरी करीत असतानाच अनुसंधानाचा अभ्यास करावा, म्हणजे पुढे नोकरी सुटल्यावर, जितका वेळ मिळेल तितका अनुसंधानात जाईल. प्रत्येक मनुष्य जन्माला आल्यापासून परमार्थाचा अभ्यास करतो आहे. प्रत्येक मनुष्याला आनंद किंवा समाधान हवे आहे, आणि त्यासाठी त्याची खटपट चालू असते. खरोखर, परमार्थाला दुसऱ्याची गरजच नाही; मग दुसरा कुणी आपला परमार्थ बिघडवील कसा ? जगात जे आहे ते सर्व चांगले आहे, आपणच तेवढे बरे नाही. दरवाजे, खिडक्या, हे जसे घराचे साधन आहे, किंवा आपल्या गावी जाण्यासाठी आगगाडी हे जसे साधन आहे, त्याप्रमाणे परमार्थ साधण्यासाठी, किंवा परमात्म्याच्या प्राप्तीसाठी प्रपंच हे साधन आहे. नाहीतर नुसत्या प्रपंचामध्ये सुख नाही. प्रपंच हा इथून तिथून सगळा सारखाच. गरीबाचा असो की अडाण्याचा असो, अधिकाऱ्याचा असो की कारकुनाचा असो, या देशातला असो की त्या देशातला असो, प्रपंचाचा धर्म जो उणेपणा, अपुरेपणा किंवा तात्पुरतेपणा, तो कधीही कुठेही बदलत नाही. म्हणून जे आपल्यापाशी नाही ते ज्याच्यापाशी आहे त्याच्या प्रपंचाला पाहून आपण भुलून जाऊ नये. आहे त्यात समाधान ठेवावे. परमार्थात अधिकार कुणी कुणाला देऊन येत नसतो; आपला अधिकार आपल्या कृतीवर अवलंबून असतो. परमार्थाची जाणीव जेवढी दुःखात होते, तेवढी सुखात असताना होत नाही. ते सुख शेवटी दुःखांतच लोटते. ज्या जाणीवेने आपण सर्व ज्ञान मिळवितो, ती काय आहे हे जाणण्याचा कुणी प्रयत्न करीत नाही. वैषयिक बुद्धी



विकारांना सामील झाली म्हणजे ते प्रबळ होऊन घातक ठरतात. अशा वेळी, मनात येईल तसे वागण्याचे टाळले तर विकार दुबळे होतात. मी विकारवश होत असेन, तर अखंड प्रेमयुक्त नामस्मरण करणे जरूर आहे. विकारांना वश न होता, प्रारब्धाने आलेले विषय भोगावे म्हणजे त्यांचे काही चालणार नाही. थर्मामीटर ताप दाखवितो, घालवीत नाही. तद्वत शास्त्रे आपले कुठे चुकते ते दाखवितात, काय करावे ते दाखवितात, पण करणे आपल्याकडेच आहे. समर्थांना राम दिसला, आम्हांला का दिसू नये ? तर आम्ही समर्थांप्रमाणे श्रद्धा ठेवून उपासना सतत आणि आदराने करीत नाही म्हणून. कसेही करा, पण मी रामाचा आहे ही भावना जागृत ठेवा. नाम जाणून, अजाणून, श्रद्धेने, अश्रद्धेने, कसेही घ्या, राम तुम्हाला अन्नवस्त्राला कमी करणार नाही हे खास ! नाम श्रद्धेने घेतले तर विशेषच फळ. म्हणून अखंड नामात रंगून आनंदात राहू या.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

आपण मात्र त्याने सांगितलेला साधनात राहून, त्याला त्याची कामगिरी करण्यात अडथळा न येईल असे वागणे जरूर असते. हा अडथळा अनेक प्रकारचा असतो. एक म्हणजे, त्याने सांगितलेल्या साधनाबद्दल शंका घेणे;



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

दुसरे, दुसऱ्याला अमुक एक दिवसात साधले, मला अजून का साधत नाही, असा विचार मनात येणे; आणि तिसरे, सांगितलेल्या साधनापेक्षा काही अधिक किंवा कमी करण्याचा प्रयत्न करणे. थोडक्यात म्हणजे, एकदा संताच्या पायावर डोके ठेवल्यावर, आपला प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही त्याच्याकडे सोपवून, प्रपंचत घडणाऱ्या गोष्टी त्याच्याच इच्छेने घडताहेत अशी भावना ठेवून, आपले कर्तव्य करीत, त्याने सांगितलेल्या साधनात एकनिष्ठेने राहणे, हाच खरा मार्ग आहे. व्यवहारात काम, क्रोध, लोभ वगैरे सर्व काही असावे, पण आपण त्यांच्या स्वाधीन न होता, त्यांना आपल्या ताब्यात ठेवून वागावे; म्हणजे देहभाव आपोआप नष्ट होऊन जाईल. हे सर्व साधायला, परमेश्वराला शरण जाणे हा एकच सोपा मार्ग आहे.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

जीवन्तोऽपि मृताः पञ्च व्यासेन परिकीर्तिताः ।
दरिद्रो व्याधितो मूर्खः प्रवासी नित्यसेवकः ॥
सरलार्थ - हे पाच लोक जिवंत असून मेल्यासारखे होत, असे व्यासांनी सांगितले आहे. (कोणते ? ) दरिद्री, सदा रोगग्रस्त, मूर्ख, (सदा) प्रवासी आणि नेहमी कोणाचा तरी चाकर.
स्पष्टीकरण - दरिद्र्याला कसले आले आहे जीवन ! सदा रोगी म्हणजे तो मेल्यातच जमा. कारण तो काही हालचालच करू शकत नाही. मूर्खाला जीवन म्हणजे काय तेच कळत नसते. प्रवास चांगला, ही गोष्ट खरी; पण सदा प्रवास हा सुद्धा कष्टदायकच. त्याला निवांतपणे बसून चार दिवस आनंदात घालवायला जागाच नसते; आणि सदैव ज्याला कोणाची ना कोणाची तरी चाकरीच करावी लागते, त्याला स्वतंत्र जीवनच नसते.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २६ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# लासलगाव बाजार समितीत पोलीस बंदोबस्तात लिलाव

## अफगाण कांदा पंजाबमध्ये : शेतकरी संतप्त

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर अवास्तव शुल्क लावल्याच्या निषेधार्थ नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्या बंद होत्या मात्र आज दि.२५ ऑगस्ट रोजी पोलीस बंदोबस्तात लासलगाव बाजार समिती सुरु झाली असली तरी येवला बाजार समितीत आजही शुकशुकाट होता. त्यातच अफगाणीस्थानचा कांदा पंजाब मध्ये आल्याच्या आधुनिक केसरीच्या बातमीने शेतकऱ्यांच्या संतापात वाढ झाली.

केंद्र सरकारने कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लागू केल्यानंतर निर्माण झालेली कांदाकोंडी फुटण्याचे संकेत असताना काल प्रत्यक्षात 'नाफेड' बाजार समितीत खरेदीला न उतरल्याने शेतकऱ्यांनी संतप्त होत लिलाव बंद पाडले तर मुंबई आग्रा महामार्ग रोखण्यात आला. मात्र आज दि.२५ पासून लिलाव सुरु न केल्यास परवाने रद्द केले जातील असा इशारा व्यापाऱ्यांना मिळाला त्यामुळे लासलगाव येथील व्यापारी लिलावात उतरले. त्यामुळे आज पोलीस बंदोबस्तात लासलगावला लिलाव सुरु झाले आहेत. मात्र या लिलावाकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली असून आवक रोडावल्याचे चित्र आहे. येवला बाजार समितीत आजही शुकशुकाट पहायला मिळाला. दरम्यान आज अमृतसर पंजाब येथील बाजार समितीत अफगाणीस्थान येथून ६० टन कांदे विक्रीस आले असून त्यांना सरासरी २१०० ते २२०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला असल्याची माहिती येवला बाजार समिती संचालक व व्यापारी भरत समदाडिया यांनी आधुनिक केशरीशी बोलताना दिली. याबाबत सर्वप्रथम आधुनिक केसरीने वृत्त दिले. हे वृत्त व्हायरल होताच शेतकऱ्यांमध्ये संताप बघायला मिळाला. केंद्र सरकारने भारतातील कांदा निर्यात होऊ नये यासाठी कांदा निर्यातीवर अवास्तव शुल्क लावले आहे. मात्र याउलट अफगाणीस्थान सारख्या देशातून येणाऱ्या हलक्या प्रतीच्या कांद्याला भारतीय कांद्यापेक्षा जास्त भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

> काल जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश देऊन सुद्धा आज नाशिक जिल्ह्यातल्या कुठल्याही बाजार समितीत कांदा खरेदीसाठी नाफेड आले नाही . केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या भावना समजून न घेता शेतकऱ्यांना फक्त शेंडी लावण्याचे काम सरकार करत आहे . बाजारातून चांगला भाव मिळत असतांना कांदा निर्यातीवर अवास्तव शुल्क लावून भाव पाडले आहेत . शेतकऱ्यांच्या पदरात काही पडावे असे सरकारला मनापासून वाटत असेल तर निर्यात शुल्क पूर्णपणे हटवावे . जर सरकारने निर्यात शुल्काचा निर्णय मागे न घेतल्यास शेतकऱ्यांचा यापेक्षा अधिक तीव्र असंतोष राज्यभर रस्त्यावरती दिसेल . **संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**



# अधिस्वीकृती समिती अध्यक्ष यदू जोशी यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या राज्य पत्रकार अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी लोकमतचे सहसंपादक यदू भाऊ जोशी यांचा बहुमताने विजय झाला.त्यानंतर मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सभागृहात सत्कार करण्यात आला. त्यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनीही सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मंत्रालय वार्ताहर संघाचे पदाधिकारी दिलीप सपाटे, चंदन शिरवळे,खंडूराज गायकवाड, महेश पवार, मंदार पारकर यांच्यासह राज्यभरातील सदस्य उपस्थित होते.

# भक्तीचा आनंद भगवंतापेक्षा भक्ताला अधिक मिळतो : ह.भ.प. रामगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भगवंतकृपा व्हावी म्हणून भक्त मनोभावे भगवंत सेवा करीत असतो, अशा या निस्सीमपणे केलेल्या भगवंत भक्तीचा आनंद भगवंतापेक्षा भक्ताला अधिक मिळतो यास्तव भक्ताने भगवंतसेवेत कदापिही खंड पडू देऊ नये, असे अमृततुल्य विचार सरला बेट (गोदाधाम)चे मठाधिपती हभप रामगिरी महाराज यांनी वैजापूर येथे २१ऑगस्टपासून सुरू असलेल्या १७६अखंड हरिनाम सप्ताहाच्या पाचव्या दिवसाशी चौथे वाकपुष्प गुंफतांना शुक्रवारी प्रवचनात केले,महाराज पुढे म्हणाले की, सत्संगरुपी झाडांची फांदी हातात आल्यावर जीवनातील सर्व व्यथा दूर होतात,मनातील सर्व दोष दूर करण्यासाठी साधू संतांचा सत्संग व कृपा असावी लागते असेही ते पुढे म्हणाले, महाराज चौथे वाकपुष्प गुंफताना पुढे म्हणाले की, शिवसंहिता ग्रंथात जिज्ञासा वृत्तीचे चार साधक सांगितले आहेत. मृदुसाधक, मध्यम साधक,अभिमात्र साधक व अभिमात्र तीव्र साधक या चारही साधकांचा ईश्वर अनुभूती व साक्षात्कार वेगवेगळ्या विचार व गुणांत्मकता वर अवलंबून असतो व काळही वेगवेगळा असतो, असे ते पुढे म्हणाले. आज पाचव्या दिवशी विधान परिषद चे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे व माजी आ. भाऊसाहेब पा. चिकटगावकर, हर्षवर्धन भागवत कराड यांची ही उपस्थिती होती.



# श्रीनाथ हायस्कूल येथे 'मेरी माटी मेरा देश'

आधुनिक केसरी न्यूज

पैठण : पोलीसाच्या वतीने श्रीनाथ हायस्कूल येथे मेरी माटी मेरा देश या कार्यक्रम संपन्न झाला. डॉ.सिद्धेश्वर भोरे उप विभागीय पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या नेतृत्वात देशासाठी बलीदान दिलेले हुतात्मा, स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक यांचे कुटुंबातील व्यक्तींना मेरी माटी मेरा देश कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. तसेच श्रीनाथ हायस्कूल चे सर्वच शिक्षक व विद्यार्थी या ठिकाणी उपस्थिती होते.सर्व प्रथम
सदर कार्यक्रमात सर्व सैनिकांचा तसेच त्यांच्या कुटुंबातील हजर व्यक्तीचा शाल ,श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मेरी माटी मेरा देश या अभियानांतर्गत डॉ. सिध्देश्वर भोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, सहाय्यक पोलीस जनाबाई सांगळे, मनोज वैद्यसह पोलीस अधिकारी उपस्थिती होती.


# लोणी भापकरचा प्राचीन शिल्प ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर

## मल्लिकार्जुन शिवालय अद्यापही उपेक्षित, पुरातत्व विभागाची उदासीनता तर शासनाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**विजयकुमार हरिश्चंद्रे**

**लोणीभापकर :** महाराष्ट्रातील बारामतीच्या पंचक्रोशीतील लोणीभापकर या पौराणिक ऐतिहासिक भूमीवरील शिल्प संस्कृतीने समृद्ध असलेल्या प्राचीन शिवालय मंदिराला निधी मंजूर होऊनही डागडुजीबाबत चालढकल होत आहे. पुरातत्व विभागाच्या हालगर्जी आणि उदासिनेतेमुळे प्राचीन पौराणिक अशा तेराव्या शतकातील शिल्प आणि बांधकाम शैलीतिला या मंदिराला अल्पवधीतच मुकावे लागण्याची भीती शिवभक्तांनी व्यक्त केली आहे. भापकर या ऐतिहासिक सरदार घराण्याचा कुलस्वामी असलेले मल्लिकार्जून शिव मंदिर आपल्या आगळ्या वेगळ्या पाषाण शैलीच्या बांधकाम पद्धतीने ओळखले जाते. सध्या श्रावण महिना असल्या कारणाने एकांतातील हे शिवालय भाविक भक्तांच्या गर्दीने लक्ष वेधून घेत आहे. मल्लिकार्जून शिवालयास विदेश प्रवासी, अभ्यासक केविन स्टयडेज यांनी खास भेट देऊन या मंदिरास वेळीस लक्ष न दिल्यास हा अनमोल ठेवा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली आहे. या बाबत ग्रामस्थांनीही राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन दिले असल्याचे सांगितले.



# रोहित पवारांना अजित पवारांची जागा घ्यायचीय

## हसन मुश्रीफ यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार शुक्रवारी कोल्हापूर दौऱ्यावर जात आहेत. कोल्हापुरातील दसरा चौकात शरद पवारांची सभा होणार आहे. या सभेतून शरद पवार अजित पवार गटाचे नेते हसन मुश्रीफ यांच्यावर टीका करण्याची शक्यता आहे. या सभेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी हसन मुश्रीफ यांच्यावर टीकास्त्र सोडले. कोल्हापूर जिल्ह्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पक्षाला संपवण्यामध्ये काही नेत्यांचाच हात असावा, असे आता कार्यकर्त्यांकडून ऐकायला मिळत आहे, असे वक्तव्य रोहित पवार यांनी केले आहे.
शिवाय कोल्हापुरातील उद्योग जगताला स्थानिक नेत्यांचा त्रास आहे. त्यामुळे तेथील उद्योग विस्तार करायला घाबरत आहेत, असेही रोहित पवार म्हणाले. रोहित पवारांच्या टीकेला हसन मुश्रीफ यांनी प्रत्युत्तर दिले आहे. रोहित पवार यांना अजित पवारांची जागा घ्यायची आहे, असे मला वाटते. त्यांनी कुटुंबाचा वाद वाढवण्याऐवजी मिटवायला हवा, असे मुश्रीफ म्हणाले. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. रोहित पवारांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना हसन मुश्रीफ म्हणाले, रोहित पवार हे फार नवीन आणि नवखे आहेत. ते कशासाठी एवढे मोठे धाडस करतायत, तेच मला कळत नाही. बहुतेक अजित पवारांची जागा त्यांना घ्यायची आहे, असे मला वाटते. कुटुंबाचा वाद त्यांनी मिटवायला हवा.

# ‘प्रज्ञान’चा प्रवास सुरु

आधुनिक केसरी

चांद्रयान-३ चे ‘विक्रम’ लँडर १४ जुलैला पृथ्वीच्या पृष्ठभागावरून झेपावले होते. यानंतर २३ ऑगस्टला ‘विक्रम’ लँडर अलगदपणे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरत भारताने नवा इतिहास घडवला होता. भारतीय अंतराळ संस्थेने ( इस्रो ) जाहीर केलेल्या वेळेनुसार २३ ऑगस्टला सहा वाजून चार मिनिटांनी चांद्रयान चंद्राच्या पृष्ठभागावर उतरले. आता ‘विक्रम’ लँडरमधून ‘प्रज्ञान’ रोव्हर बाहेर पडला असून, ‘इस्रो’ने त्याचा व्हिडीओ शेअर केला आहे. चांद्रयान-३ मोहिमेतील ‘प्रज्ञान’ रोव्हर ‘विक्रम’वरून बाहेर पडला असून, त्याने दक्षिण ध्रुवावरील चंद्राच्या पृष्ठभागाचा अभ्यास सुरु केला आहे. लँडर आणि रोव्हरवरील सर्व यंत्रणा सुरळीत सुरु असल्याचं ‘इस्रो’ने जाहीर केले आहे. प्रज्ञान’ रोव्हरवरील चाकांवर भारताचे राष्ट्रीय चिन्ह अशोक स्तंभ आणि ‘इस्रो’च्या लोगोची छाप आहे. ‘इस्रो’ने शेअर केलेल्या व्हिडीओत फिकटपणे चंद्राच्या पृष्ठभागावर ही छाप उमटवताना दिसत आहे. दरम्यान, चंद्रावरील एक दिवस ( पृथ्वीवरील १४ दिवस ) ‘विक्रम’ लँडर आणि ‘प्रज्ञान’ रोव्हरचा प्रवास सुरु राहणार आहे. तरी, चंद्रावर दुसरा दिवस ( पृथ्वीवरील १४ दिवसांनी ) उजाडल्यानंतर लँडर आणि रोव्हर पुन्हा सक्रीय होतील, अशी अपेक्षा ‘इस्रो’मधील संशोधकांना आहे. काही दिवसांपूर्वी ‘इस्रो’चे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी याचं सुतोवाच केले होते. “सूर्यास्त झाल्यानंतर त्या ठिकाणी मिट्ट काळोख होतो आणि तापमान उणे १८० अंश सेल्सिअसपर्यंत खाली येते. या तापमानात उपकरणे टिकणे अवघड आहे. मात्र, ती टिकली, तर आणखी १४ दिवसांनी दिवस उजाडल्यानंतर पुन्हा एकदा ‘प्रज्ञान’ आपली मोहीम सुरु करू शकेल, असे एस. सोमनाथ यांनी म्हटले होते. प्रज्ञान रोव्हरच्या मदतीने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील दगड, माती, विवरे यांचा अभ्यास केला जाणार आहे. चंद्राच्या पृष्ठभागावरील टेकड्या आणि विवरांच अचूक स्कॅन करण्याचा प्रयत्न रोव्हरच्या साहाय्याने केला जाणार आहे. या परिसराची छायाचित्रे काढून त्याचा अभ्यास केला जाणार आहे.

# पंजाब डख यांच्यासह हवामान खात्याचे अंदाज फेल



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**आपल्या देशाचं चंद्रयान अखेर चंद्रावर उतरलं. प्रत्येक भारतीय नागरिकांची कॉलर टाईट होईल असा ऐतिहासिक क्षण याचि देहि, याचि डोळा अनुभवला. गौरवशाली इतिहासाचे सर्वत्र कौतुक होत असताना मराठवाड्यातील माय-बाप जनता, शेतकरी राजा नव्हे तर बीड जिल्ह्यातील सामान्य लोकांची चेहरे देखील कालवंडली असुन यंदाच्या पावसाळ्यातले तीन महिने कोरड ठणक गेले. पंजाब डकसह हवामान खात्याचे अंदाज चुकले. खरीपाची पिके नेस्तनाबुत झाली आणि आता थेंब थेंब पाण्यासाठी धावपळ सुरू झाली असताना एकुण अंदाज पहाता भयानक दुष्काळ ज्याची चाहुल लागलीच असं म्हणायला हरकत नाही. परतीच्या पावसावर मदार वाटत असली तरी दडी मारलेला पाऊस पुन्हा 07सप्टेंबरपर्यंत रजेवर गेल्याची माहिती मिळते.**

शेतकरी मेला आता मुबलक विम्याशिवाय पर्याय नाही अशी परिस्थिती. कुणाला कशाचं आणि कशाला कुणाचं पडलंय ?त्यापेक्षा वर्तमान स्थितीत पाऊस न पडल्याचं संकट किती भयानक याची कल्पना न करणे बरे. बुधवारी भारतीय चंद्रयान ज्याचं स्पॉट लँडिंग यशस्वी झालं. जगाच्या पाठीवर आपण आता चौथ्या क्रमांकाचे यशस्वी देश म्हणून ठरलो. चंद्रयान यशस्वी भारतीय शास्त्रज्ञाची कमाल बुद्धी आणि ज्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मिळणारे प्रोत्साहन. चंद्रयान यशस्वी झाल्यानंतर जगाच्या पाठीवर आपण तंत्रज्ञानात सक्षम असल्याचं दाखवुन दिलं ज्याचं कौतुक इतर देश पण करतात. हा आनंद आणि इतिहास आपण सारे पहात असताना दुसरं एक संकट विशेषतः मराठवाडा आणि बीड जिल्ह्यातील जनतेवर येवु पहातं ज्याची मनात कल्पना केली तरी अंगावर शहारे येतील असं आहे. मागोवा घेतला तर जुनमध्ये पाऊस पडला नाही. जुलैच्या पहिल्या पंधरवाड्यात खरीपाच्या पेरण्या एवढाच पाऊस पडला. त्यानंतर ऑगस्ट महिना पुर्णतः कोरडा जात आहे. डोकं भिजेल एवढाच पाऊस यंदा आपण पाहिला. आजमितीला नदी, नाले, मोठे मोठे प्रकल्प कोरडेठणक पडले असुन भर पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला.विहीरी आणि बोरची पाणीपातळी ऑगस्ट महिन्यात खाली जाणं याचाच अर्थ फार मोठा दुष्काळ याची भिती मनात निर्माण होणं म्हणता येईल. खरीपाचं काही आता हाती लागु शकत नाही. कारण 100 टक्के पिके नेस्तनाबुत झाली. जिथे ऊसासारखं उत्पादन धोक्यात आलं तर मग सोयाबीन, कापसाचा तर धुरळाच होणार. एक रूपायात विमा केंद्र सरकारची योजना आता खऱ्या अर्थाने सरसकट मंजुर व्हायला हवी. कारण कुणाच्याही शेतात पिके येवु शकत नाहीत. खरीपाचा धुराळा झाला. अशी परिस्थिती सद्या असुन कुठल्याही मंडळात सरासरीपेक्षा पाऊस झालेलाच नाही. किमान बीड जिल्ह्याची अशी परिस्थिती आहे. लातुर, धाराशीव, जालना, संभाजीनगर, परभणी, हिंगोली या जिल्ह्यात पाऊस पडलेला नाही. नांदेडचा अपवाद वगळता थेंब नाही. यंदा वीजेचा कडकडाट नाही. रागाचं आभाळ भरून पाहिलेले नाही. भर पावसाळ्यात गरमी आणि हवा एकंदरीतच भयानक संकट येवु घातलं असुन आता लोकांच्या नजरा परतीच्या पावसाकडे



लागल्या. पोळा, महालक्ष्म्या उत्सव तोंडावर आहेत. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील भयानक भेडसावणार. सद्याच हिरवंगार वाटत असले तरी चारा निर्माण होईल एवढा पाऊस पडलेलाच नाही. कुठे नदीला पाणी ना तलाव भरलेले. विहीरी कोरड्या, हातपंप पाण्याविना अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. देशाच्या साऱ्या घडामोडीवर सर्वांचे लक्ष्य. पण बळीराजा किती संकटात? हे आता डोकावुन पहायलाच हवं. खरं तर मराठवाडा पुर्ण संकटात येवु घातलाय. इतर विभागात पाऊस बरा असला तरी इकडे मात्र 10 टक्के पाऊस देखील पडलेला नाही. सरकारने सुद्धा इतर विभागात होणारा खर्च बचत करून आता मराठवाड्यातील संकटासाठी निधी राखीव ठेवण्याची फार मोठी गरज वाटते. परतीचा पाऊस पडेल असं वाटत असताना मिळालेली माहिती भयानक असुन अगोदरच दडी मारून बसलेला पाऊस पुन्हा पंधरा दिवस रजेवर गेल्याची माहिती हवामान खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिली. यावर्षी पंजाब डक ज्यांना हवामान खात्याचा अभ्यास म्हणून ओळखल्या जाते. त्यांचे भविष्य मराठवाड्यासाठी 100टक्के चुकीचे ठरले असुन त्यांनी अंदाज वर्तवला पण पाऊस पडला नाही. त्यामुळे आता त्यांच्या अंदाजावरही लोकांना शंका कुशंका येवु लागल्या. शासनाच्या हवामान खात्याने ऑगस्ट महिन्यात मराठवाड्यात चांगला पाऊस पडेल असं भविष्य सांगितलं पण तो अंदाज देखील चुकीचा ठरला. रोज आभाळ येतंय आणि जातयं. लोकांच्या नजर आभाळाकडे आता शेतात जावु वाटेना आणि तोंडात घास खाता येईना अशी परिस्थिती बळीराजाची झाली. दुष्काळ पडेल का? याचं उत्तर होच असुन उरलेल्या काळात पाऊस पडेल यावर आता भरवसा नाही. प्रत्येक तीन वर्षाला दुष्काळाचे हे दुष्टचक्र ज्याचा सामना मराठवाड्याला करावा लागतो. तो पडण्याची वाट पहाण्यापेक्षा आतापासूनच सरकारी पातळीवर उपाययोजना हाती घ्याव्या लागतील. कारण पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावल्याशिवाय रहाणार नाही. वास्तविक पहाता आला पोळा आणि पाऊस झाला भोळा या उक्तीप्रमाणे ज्या हंगामाचे तीन महिने कोरडे ठणक गेले जो पाऊस यंदा जुनपासुनच भोळा झाल्याची परिस्थिती म्हणावी लागेल. शेतकऱ्यांच्या मदतीला आता सरकारचा हातभार एवढीच आशा असुन अनुदान असेल किंवा विमा आता सातबारा बघुनच देण्याची गरज वाटते. बाकी काही असलं तरी संभाव्य हवामान लक्षात घेता आता परतीचा पाऊस मराठवाड्यात पडेल याची खात्री देताच येत नाही. एव्हाना आशावाद धरला तरी सकारात्मक विचारासाठी ठीक पण सरकारने मात्र दुष्काळ पडतोय समोर येतोय हे लक्षात घेवुनच उपाययोजना सुरू केल्या तर काही बरं अन्यथा दुष्काळ पडल्यास ?त्यापेक्षा पुर्व तयारी महत्वाची वाटते. सद्यस्थितीत तरी निर्माण झालेली भयानक परिस्थिती ज्यामुळे बळीराजासह सर्वसामान्य जनतेची चेहरे 100 टक्के काळवंडली असुन बीड जिल्ह्यात 100 टक्के खरीप पिक नेस्तनाबुत झालं याचा धुराळा उडताना दिसु लागला हे मात्र नक्की. आता पावसाच्या सरी जरी आल्या तरी सोयाबीन, कापुस, कडधान्ये आदी पिके हाती लागणार नाहीत तर ऊस उत्पादनही घटल्याशिवाय रहाणार नाही. नाममात्र वाढलेल्या ऊसाचा जनावरांचा चारा म्हणून राखीव ठेवावे लागेल हे मात्र नक्की. चला तर मग सारेच मिळुन संकटाचा सामना करण्यासाठी सज्ज होवुया.एवढ्यावर परमेश्वर काही कृपा झालीच तर परतीचा चांगला पाऊस पडावा, नदी, नाले, धरणे भरावीत किमान खरीप हाती लागले नाही तरी रब्बी पिके पदरात पडतील अशी मनाची समजुत घालायला काही हरकत नाही.

# चंद्रावर तिरंगा ; शास्त्रज्ञांची ऐतिहासिक कामगिरी!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**२३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान - ३ या नावाने ओळखली जाते. याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला.**

२००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्रोने सुरवात केली त्यानंतर चार वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती. चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग आहे. गेल्या वेळी जेंव्हा आपल्याला या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला होता म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या ठामपणे उभी राहिली. देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्वास आहे याच विश्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. गेल्या वेळेच्या मोहिमेच्या अपयशातून धडा घेत यावेळी शास्त्रज्ञांनी या मोहिमेसाठी पुरेपूर काळजी घेतली होती. यानातील काही घटक ऐनवेळी कार्यन्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती. सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले त्यामुळे यावेळी आपले यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्वास देशातील १४० कोटी जनतेला होता. इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्वास सार्थ ठरवला. चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला. या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळेल. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळेल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात



चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास येईल एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरणार आहे. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली. गेली चार वर्षे शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली. चांद्रयान ३ मोहीमेसाठी रात्रीचा दिवस करणाऱ्या आपल्या शास्त्रज्ञांचे मनापासून अभिनंदन ! चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले आहे की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे.

७६ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे. या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. ही मोहीम यशस्वी करून चंद्रावर तिरंगा फडकवणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांचे पुनश्च एकदा अभिनंदन ! जय हो!!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# वाशी तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीसांची संपूर्ण आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**वाशी :** ग्रामीण रुग्णालय वाशी येथे मा.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजाभाऊ गलांडे सर,मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.हारिदास सर,यांच्या मार्गदर्शनानुसार ,व मा. वैद्यकीय अधिक्षक डॉ. दयानंद कवडे सर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गोवर्धन महिंद्रकर सर, बालविकास अधिकारी राठोड जे. जी. वाशी यांच्या पुढाकाराने आजादी का अमृत महोत्सव व रक्षाबंधनचे औचित्य साधुन डॉ. आनंदीबाई जोशी आरोग्य तपासणी शिबिरांतर्गत वाशी तालुक्यातील सर्व आंगणवाडी सेविका व मदतनीस यांची संपूर्ण आरोग्य तपासण्या करण्यात आल्या यामध्ये CLINICAL BREAST EXAMINATION, ORAL EXAMINATION, DENTAL EXAMINATION, X-RAY तसेच NCD अंतर्गत CBC, BSL(R), URINE (R), BP, LIPID PROFILE, ECG, VIA, ICTC, इ. तपासण्या करण्यात आल्या , या तपासणी साठी डॉ. सुधीर अवटे (सर्जन),डॉ. दिपक निभोरकर जनरल कम्युनिटी ऑफिसर उस्मानाबाद,डॉ.कृष्णा उंदरे- देशमुख (दंतशल्यचिकित्सक) वैद्यकीय अधिकारी डॉ.तेजस काळे डॉ.अमर तानवडे डॉ.सजिव गरड, डॉ.प्रविण कुलकर्णी,डॉ.सिध्दिकी मॅडम, व आरोग्य पर्यवेक्षक श्री.पदमाकर कोठावळे श्री.विशाल रणदिवे विस्तार अधिकारी , रुग्णालयीन संपूर्ण अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

या शिबिरामध्ये एकुण 251 आंगणवाडी सेविका व मदतनीस यांची तपासणी करून ग्रामीण रुग्णालय वाशी येथे उपचार करण्यात आले. त्यापैकी 18 गंभीर आजारी सेविका व मदतनीस यांना पुढील उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उस्मानाबाद येथे संदर्भित करण्यात येणार आहे.

# लोणी ग्रामपंचायत गाव अंतर्गत सिमेंट रस्ता कामाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लोणी येथील ग्रामपंचायत गाव अंतर्गत सिमेंट रस्ता कामाला प्रत्यक्षात सुरुवत करण्यात आली. थेट लोकनियूक्त सरपंच गुलशनबी सत्तार पटेल यांच्या हस्ते श्रीफळ फोडून प्रत्यक्षात कामाची सूरवात करण्यात आली. पदवीधर मतदार संघाचे आमदार सतिष भाऊ चव्हाण यांच्या स्व इच्छा स्थानिक निधीतून लोणी तालुका खूलताबाद येथे दहा लक्ष रुपये खर्च करून लोणी गाव अंतर्गत प्रत्यक्षात कामाला सूरवात करण्यात आली. यावेळी भाजपा अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तथा तंटामुक्त अध्यक्ष सत्तार, शब्बीर पटेल, उपसरपंच बळीराम दांडेकर, माजी उपसरपंच सत्तार, सूभान पटेल, ग्रा.पं. सदस्य मोईन पटेल, कैसर पटेल, बानोबी गूलाबनबी पटेल, सलीम करीम पटेल, इनूस हूसेन पटेल, सागर दांडेकर, मूक्तार हाशम पटेल, गफूर मैलाना यांच्यासह गावातील नागरीक मोठ्या संखेने उपस्थित होते सर्व गावकर्यानीं आमदार सतीश चव्हान यांचे आभार व्यक्त केले.



# वाशीम शहरात एकाच रात्री चार चोरीच्या घटना

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** मंगळवारी रात्री शहरातील अनेक ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या. बुधवारी सकाळी दुकानाचे शटर वाकलेले दिसून आल्याने चोरी झाल्याचा संशय आला. याप्रकरणी चार ठिकाणी चोरी झाल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

शहरात गत काही दिवसापूर्वी मुख्य बाजार पेठ असलेल्या पाटणी चौकातील कापड दुकानात चोरीची घटना घडली होती. त्यातच मंगळवारी रात्री शहरातील शिवाजी शाळे समोरील ताडपत्रीचे दुकान, पतंजली, खामगाव जिन येथील किराणा दुकान व रेल्वे स्टेशन जवळील किराणा दुकान यासह शहरातील इतर ठिकाणी चोरट्यांनी दुकानाचे शटर वाकवून मुद्देमाल व काही रक्कम चोरून नेल्याचा संशय व्यक्त केला जात असून किती रुपयाची चोरी झाली याबाबत पोलीस चौकशी करीत आहेत. शहरात एकाच रात्री अनेक ठिकाणी चोरीच्या घटना घडल्याने व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण आहे. शहरात अवैधरित्या बंदुका बाळगल्या प्रकरणी पोलिसांनी काही युवकावर कारवाई केली होती. वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस विभागाकडून दुचाकीवर व सायकलीवर गस्त दिली जात आहे. क्यू आर कोड उपक्रम राबविण्यात येत आहेत.




महाराष्ट्र Business Katta












# काळ्या मातीशी करी हितगुज हिरवा श्रावण... कळ्या-फुलांशी करी हितगूज हिरवा श्रावण...

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २९

श्रावण म्हणजे काळ्या मातीला पडलेलं हिरवं स्वप्न. वृक्षवेलींनी टाकलेली कात म्हणजे श्रावण. काळ्या मातीशी गूज सांगणारा ऋतु म्हणजे श्रावण.... नव्या उल्हासाला उधान आणणारा ऋतु म्हणजे श्रावण...या श्रावणाचे कौतुक करावे तेवढे थोडेच...परंतु श्रावणाच्या आगमनाची वाट पाहता पाहता चार महिने उन्हाच्या आगीने अंगाची लाही लाही झालेल्या काळ्या मातीला आठवताना जीवच लाही लाही होतो...चैत्र-वैशाखात जेव्हा सूर्य आग ओकू लागतो तेव्हा माणसं, पशु, पक्षी झाडाच्या सावलीचा आधार घेऊ लागतात आणि त्याचवेळी जिवाची लाही लाही होत असूनही पाण्यासाठी तरसत असलेली धरित्री आपल्याच पोटातील पाण्याची ओल अनंतकोटी झाडांना पुरवत असते..

**किती तरसली माती**
**तेव्हा बरसलं नभ**
**कैक युगांचा जुनाच**
**आज कामी आला लोभ**


इथल्या माणसांना, पशु पक्षांना, झाडांना, वेलींना, पाना -फुलांना जगवण्याचं काम ही काळी माती अखंड करत असते. काळ्यामातीचं सगळ्या सजीवांवर असलेलं ऋण शब्दातीत आहे.......

यावर्षी मृग तर बरसलाच नाही.. रोहिणी भरणीच्या ओलाव्यानंतर अनंत दिसांची तृष्णा अधरात घेऊन तरसल्या धरित्रीने प्राशून घेतले धो-धो बरसल्या पावसाचे टपोरे थेंब. श्रावणसरीने पानाफुलांचा गंध चौफेर उधळला... तिने मधाळ अधरांवर खट्याळ श्रावणसरींची सळसळ गोंदून घेतली.... चंदनगंधी शिरशिरी आली तिच्या सावळ्याकुशीला....श्रावणचिंब वेलींना बिल्गले ऋतुरंगाचे नक्षत्र.. सावळी काया न्हाली ऋतुरंगात.... तसं..तिनं भूलवलेलं.. झुलवतांना पेलवलं आभाळ....मग धरित्रीचे रंगअनंग उधळून गेला पक्षी.. ओठांदेठांवर विसरून गेला...गोंदलेली नक्षी. श्रावणाने थेंब थेंब उधळून सुगंध पेरला मातीच्या कणाकणात...

**गंध ओल्या मातीचा**
**दरवळे रानोवनी**
**पाखरांच्या ओठी आली**
**नव्या पावसाची गाणी**

पशुपक्ष्यांची किलबिल त्यांच्या सांकेतिक बोलींच्या शब्दांत श्रावणसरींचे ऋण व्यक्त करत असते... पाना-फुलांचे, फळांचे आभार मानत असते.... माणूस मात्र बेईमान आहे.. इथल्या प्रत्येक घटकांशी तो बेईमानी करीत आला आहे... त्याचा कमालीचा स्वार्थ त्याला ही बेईमानी करावयास भाग पाडतो... माणूस स्वतःच.. स्वतःशी बेईमानी करत असतो. स्वार्थासाठी माणसं आपला स्वभाव बदलतात...झाडं, वेली,पशू,पक्षी मात्र आपला स्वभाव बदलत नाहीत. निसर्ग आपला स्वभाव बदलत नाही... निसर्गाचा स्वभाव बदलायला भाग पाडले माणसाने.... माणसं झाडे लावत तर नाहीतच; परंतु ते तोडतात...झाडे लावण्यात पशुपक्ष्यांचा मोलाचा वाटा आहे...तुम्ही म्हणाल कसा...? तर तो असा की,..पक्षी फळे खाऊन दूर रानात इतरत्र उडून जातात, भटकतात त्यांनी खाल्लेल्या फळांतील बिया त्यांच्या विष्ठेवाटे रानात अनेक ठिकाणी पडतात, गायी गुरं व इतर प्राणीसुद्धा अशाच प्रकारे झाडांची फळे , शेंगा खाऊन रानोमाळ दूरदूर हिंडतात रानात वेगवेगळ्या ठिकाणी विष्ठा करतात...त्या विष्ठेतून फळांच्या, शेंगाच्या बिया पडतात.. उदा. शेळ्या बाभळीच्या वाळलेल्या शेंगा खाऊन चरण्यासाठी दोन चार किलोमीटर रानात फिरत राहतात. त्या बाभळीच्या शेंगा खाऊन धामुके म्हणजे बाभळीच्या शेंगातील बिया इतरत्र टाकत फिरतात. कधी तोंडावाटे तर कधी विष्ठेवाटे बिया टाकत असतात. त्या बिया पावसाळ्यात रुजतात आणि रानात अनेक ठिकाणी झाडे उगवतात. पशुपक्ष्यांची ही झाडे लावण्याची प्रक्रिया सहज घडते...मात्र माणसाला झाडाचे महत्त्व कळलेले असूनही तो कुणाच्यातरी प्रबोधनानंतर एखादं झाड लावतो...तो पीके घेतो ती पैसा करण्यासाठी..जगण्यासाठी. तो रोपटे लावतो घराच्या शोभेसाठी; मात्र स्वतःला किंवा इतरांना सावली मिळावी शुद्ध हवा मिळावी असा निर्मोही उद्देश ठेवून माणसं झाडं लावतात का ? याचे उत्तर नाही, असेच आहे.

अनेक कवींनी पाना-फुलांवर झाडांवर, पशुपक्ष्यांच्या विहार करण्यावर कविता, गीते लिहून अनेकांची मने रिझवली आहेत. क्षणभर अनेकांच्या



दुःखाची तीव्रता कमी केली आहे. काहींच्या मरण यातनांवर शब्दातून सुखाची फुंकर घातली आहे. मानसन्मानाने सुख मिळते म्हणून पुष्पगुच्छ किंवा फुले देऊन त्याचा सत्कार केला जातो व सुख दिले जाते. हे माणसाचं चांगुलपण त्यांने दाखवून दिले आहे.

पानाफुलांची तोरणं बांधली जातात... अनेक वनस्पतीची औषधं करून अनेक रोग दुरूस्त करता येतात. झाडांपासून फुले, फळे मिळतात....या निसर्गाने सजीवांना बरंच काही उधळून दिलेलं आहे... मात्र मनुष्यप्राण्याने त्याच्यावर मालकी गाजवून वेगवेगळ्या प्रकारे निसर्गाचा ऱ्हास केला आहे.... अनेकप्रकारचे प्रदुषण केले आहे... हिरोशिमा नागासाकी या ठिकाणी बॉम्ब टाकून तेथील जमीनच जाळून टाकली. तेथील जमीनीत कधीच एक गवताचे पाते सुद्धा उगवणार नाही...अशी नैसर्गिक हानी करणारा स्वार्थी प्राणी कोणता असेल तर तो आहे माणूस..!

आम्हाला निसर्गाने भरभरून दिलंय...पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण केलाय; परंतु त्या स्वर्गाचा उपभोग आम्हाला घेता आला नाही... घेता येत नाही.... श्रावणात सगळीकडे सृष्टीवर स्वर्ग अवतरलेला असतो. तो आज अवतरलेला आहे. कवींनी श्रावण महिन्यावर अनेक गीते, कविता लिहिल्या आहेत...श्रावणात अनेक श्रद्धाळू लोक भक्तीकडे वळलेले असतात. सात्विक राहण्याचा प्रयत्न करतात. या शाकाहारी व सात्विक राहण्यामागे एक वैज्ञानिक कारण आहे. त्या कारणाला आपण शास्त्रीय कारण समजतो. पूर्वी खूप पाऊस होत असायचा. पावसाच्या सततच्या पाण्यामुळे सगळीकडे घाण साचली जायची त्या घाणीवरच्या मास्या, जीव, जंतू येऊन अन्नावर बसायचे म्हणून रोगराई सुरू रहायची... म्हणून श्रावण महिन्यात मांस,मच्छी अशा प्रकारचे अन्न वर्ज्य करण्याला शास्त्रोक्त आधार दिला गेला. भाव आणि भक्ती हे शास्त्राचे मूळ आधार आहेत म्हणून श्रावण महिन्यात भक्तीभाव, श्रद्धा अशा गोष्टी रूजवल्या त्या काही प्रमाणात आजही सुरु आहेत.

रम्य आणि प्रणयरम्य गीतांची निर्मितीसुद्धा याच श्रावण महिन्यात होते. बहरलेल्या निसर्गाची, बहरलेल्या पानाफुलांची, दरवळलेल्या गंधाची, श्रावणसरींची प्रतिमा प्रतीके वापरूनच गीतंची कवितेची निर्मिती झालेली आहे. असा हा तनामनात घर करून राहणारा श्रावण, काळ्या मातीशी हितगुज करणारा, पानाफुलांशी हितगुज करणारा श्रावण... सर्वांनाच हवाहवासा वाटत असतो.

# खासदारांचे निलंबन कोणत्या परिस्थितीत होते



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते अधीर रंजन चौधरी यांना संसदेतून निलंबित करण्यात आले. याच्या निषेधार्थ विरोधी पक्षनेत्यांनी दोन्ही सभागृहात गदारोळ केला. भारतातील संसद सदस्यांचे (खासदार) निलंबन लोकसभा (लोकांचे सभागृह) आणि राज्यसभा (राज्यांची परिषद) मधील कार्यपद्धती आणि कामकाजाच्या नियमांमध्ये घालून दिलेल्या नियम आणि नियमांनुसार नियंत्रित केले जाते.**

जेव्हा एखादा खासदार अनियंत्रित वागतो किंवा गैरवर्तन करतो तेव्हा त्याला निलंबित करण्याचा अधिकार सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्याला असतो. निलंबित खासदारांची यादी पाहिली तर त्यात आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह आणि राघव चड्ढा हे आघाडीवर आहेत. २०१४ नंतर पाहिले तर अनेक खासदारांना सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणल्याबद्दल निलंबित करण्यात आले होते.

दोन्ही सभागृहात खासदारांचे निलंबन कसे आहे. लोकसभेतील खासदारांच्या निलंबनाबाबत विशिष्ट नियम ३७४ मध्ये दिले आहेत. या नियमानुसार, जर एखाद्या सदस्याने सदनाच्या कामकाजात सतत आणि जाणूनबुजून अडथळा आणला किंवा असभ्य वर्तन केले तर, सभापती ( लोकसभेचे पीठासीन अधिकारी ) त्याला ठराविक कालावधीसाठी सभागृहातून तात्काळ माघार घेण्याचे निर्देश देऊ शकतात. . हे निलंबन काही बैठकांपासून उर्वरित सत्रापर्यंत असू शकते.

राज्यसभेच्या बाबतीत , निलंबनाशी संबंधित नियम २५६ मध्ये दिलेले आहेत. लोकसभेप्रमाणे, जर एखाद्या सदस्याने हेतुपुरस्सर घोषणाबाजी करून, फलक दाखवून किंवा अत्यंत असभ्य वर्तन करून किंवा इतर कोणतेही कृत्य करून सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणला तर अध्यक्ष ( राज्यसभेचा पीठासीन अधिकारी ) त्याला ताबडतोब राज्यसभेत घालू शकतो. विशिष्ट कालावधीसाठी कर्तव्य. मीटिंगमधून माघार घेण्याच्या सूचना देऊ शकतात.

भारतातील संसद सदस्यांचे ( खासदार ) निलंबन ही अशोभनीय वर्तणूक किंवा गैरवर्तणूक लक्षात घेऊन केलेली शिस्तभंगाची कारवाई आहे. लोकसभा ( लोकसभा ) आणि राज्यसभा ( राज्यांची परिषद ) दोन्हीमध्ये ही प्रक्रिया समान असली तरी, प्रत्येक सभागृहाने स्वीकारलेल्या नियमांमध्ये आणि दृष्टिकोनात काही फरक आहेत.

खासदार संसदेत का व्यत्यय आणतात ?

गेल्या काही वर्षांत, विधिमंडळांच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी आणि राजकीय नेत्यांनी विधिमंडळांमध्ये अडथळा आणि व्यत्यय येण्याची चार व्यापक कारणे ओळखली आहेत.

राजकीय नेते आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी केलेल्या विश्लेषणानुसार, व्यत्यय आणण्याची चार मुख्य कारणे आहेतः

महत्त्वाचे मुद्दे मांडण्यासाठी खासदारांना पुरेसा वेळ नाही. सरकारची गैरप्रतिसाद आणि कोषागार खंडपीठाची सूडखोर वृत्ती ( मंत्रिपदाची बाजू ). राजकीय पक्षांकडून जाणीवपूर्वक अशांतता निर्माण करणे. संसदीय कामकाजात अडथळा आणणाऱ्या खासदारांविरुद्ध तातडीने कारवाई करण्यात अपयश.

खासदारांचे निलंबन कोण करू शकते ?

खासदारांचे निलंबन करताना सभापती किंवा अध्यक्षांनी संबंधित सदस्याचे वर्तन असे आहे यावर समाधानी असले पाहिजे की त्यांना तात्काळ निलंबित केले पाहिजे. गुन्ह्याचे गांभीर्य आणि त्याचा सभागृहाच्या कामकाजावर होणारा परिणाम लक्षात घेऊन खासदाराला निलंबित करण्याचा निर्णय घेतला जातो.

एका खासदाराचे निलंबन म्हणजे त्याचे संसदीय सदस्यत्व गमावणे असा होत नाही, हे येथे नमूद करणे महत्त्वाचे आहे. निवडून आलेले प्रतिनिधी म्हणून ते आपले स्थान कायम ठेवतात. मात्र, निलंबनाच्या काळात त्याला सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यास मनाई आहे. लोकसभेतील निलंबनाची प्रक्रिया काय आहे ? लोकसभेत नियम ३७४ अंतर्गत निलंबन केले जाते. सभागृहात सतत आणि जाणूनबुजून अडथळा आणणे किंवा असभ्य वर्तन करणे हे निलंबनाचे कारण आहे. पीठासीन अधिकारी म्हणून सभापतींना खासदारांना निलंबित करण्याचा अधिकार आहे. ठराविक कालावधीसाठी सभागृहातून ताबडतोब बाहेर पडणे आवश्यक आहे. निलंबनाचा कालावधी काही बैठकांपासून उर्वरित सत्रापर्यंत असू शकतो. सभापतींचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतो.



राज्यसभेतील निलंबनाची प्रक्रिया काय आहे ?

नियम 256 राज्यसभेतील निलंबनाशी संबंधित आहे. असभ्य वर्तन आणि सभागृहाच्या कामकाजात जाणीवपूर्वक अडथळा आणणे हे निलंबनाचे कारण आहे. पीठासीन अधिकारी म्हणून सभापतींना खासदारांना निलंबित करण्याचा अधिकार आहे. विशिष्ट कालावधीसाठी राज्यांच्या कौन्सिलमधून त्वरित माघार घेणे आवश्यक आहे. गुन्ह्याच्या गंभीरतेच्या आधारावर निलंबनाचा कालावधी निश्चित केला जातो. अध्यक्षांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतो. भारतातील खासदारांचे निलंबन हे संसदीय कामकाजादरम्यान सुव्यवस्था आणि शिष्टाचार राखण्यासाठी घेतलेला शिस्तभंगाचा उपाय मानला जातो. लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे अध्यक्ष निलंबनासाठी जबाबदार संबंधित अधिकारी म्हणून काम करत असताना या प्रक्रियेमध्ये विशिष्ट नियम आणि नियमांचा समावेश असतो. निलंबनाची लांबी गुन्ह्याच्या गंभीरतेनुसार बदलते, काही बैठकांपासून ते उर्वरित हंगामापर्यंत. निलंबनामुळे संसदेचे सदस्यत्व काढून घेतले जात नसले तरी ते केवळ निलंबित खासदाराच्या सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्यास प्रतिबंधित करते.

# आजीला समजावले सोपे तंत्रज्ञान, तिनेच केले मला सज्ञान!!



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**काल आजी स्वप्नात आली. ती अधुन मधून स्वप्नात येते थेट स्वर्गातून! माझ्यावर तिचा जीव आहे.माझे बालपण, शिक्षण तिच्याच छत्र छायेत झाले, म्हणून असेल कदाचित. ती आल्या आल्या स्वप्नात म्हणाली,"अरे तुझा व्हॉट्सअॅपवर मेसेज पाहिला.. बावरू नकोस.. इथ पर्यंत पोहोचले तुमचे इंटरनेट अन् व्हॉटस्अप.. तू त्यात लिहिलेस की इस्रो मधल्या एका वैज्ञानिकांने तुझ्या मार्गदर्शनात पी एच डी केली म्हणे.. आता हे इस्रोचे चांद्रयान थेट चंद्रावर जाऊन पोहोचले. आम्ही इथे स्वर्गात चर्चा करत होतो. एरवी करणार काय इथे? स्वर्गात देखील कंटाळा येतो आजकाल. त्याच गप्पा, तीच माणसे, तीच चर्चा.. बोर होते कधी कधी. ते जाऊ दे. मला समजावून सांग. तू काय काम केलेस त्या शास्त्रज्ञा बरोबर? मला समजेल अशा भाषेत सांग बाबा.**

तुझी ती आयआयटी ची गणिती भाषा नको! आता हे माझ्या पुढे फार मोठे आव्हान होते. चाळीस वर्षे इंजिनिअर होणाऱ्या मुलांना शिकवले. पण आता आजीला समजवायचे? तेही पीएचडीकरीता इस्रोसाठी केलेले किचकट, गुंतागुंतीचे संशोधन? मी शब्दाची जुळवा जुळव करू लागलो. हे बघ आजी, आपल्या पृथ्वी वरून अंतराळात स्याटेलाईट सोडतात. खूप दूर अंतरावर असते ते. पण इथून त्याच्याशी सतत संपर्क ठेवावा लागतो. त्याची विचारपूस करावी लागते. त्याची तब्येत तपासावी लागते. म्हणजे तो दिलेले काम पूर्ण व्यवस्थितरीत्या करतोय की नाही हे बघावे लागते. बरोबर बोललास बाळा. अरे तू आयआयटीला गेलास तेव्हा माझाही जीव तुटत होता तुझ्यासाठी. पण तेव्हा मोबाईल नव्हते रे ! "होय आजी,आता खूप प्रगती झाली आहे. पण ते स्याटेलाईट फार म्हणजे लाखो किलोमिटर दूर असते. तिथे एक रीसिवर असतो. आपण इथून ट्रान्समिटरने संदेश पाठवायचा. पण तिथे जाई पर्यंत तो अतिशय वीक होतो. समजलं?"
" हो रे. तेव्हढ इंग्रजी कळतं. इथे बरेच जण बोलतात इंग्रजी. देवांना देखील कळायला लागलं इंग्रजी आजकाल. बोल पुढे "
"इथून आम्ही अंटेनाने म्हणजे गच्चीवर टीवीसाठी जे तवा सारखे लावतात ते, तर त्याने सिग्नल पाठवतात. तिथे ही अंटेना ने ते रिसिव्ह करतात. आता आम्हाला तो तिथला रिसिव्हर तयार करायचा होता. म्हणजे डिझाईन करायचा.तो उत्तम असायला हवा. त्याने उत्कृष्ठ काम करायला हवे. ते आमच्या पुढे आव्हान होते. तोच त्या शास्त्रज्ञाच्या संशोधनाचा विषय होता. "त्यात काय मोठं सोपय ते"नाही आजी. ते वाटत तितकं सोपं नसतं. इकडून तिकडे संदेश पाठवताना, हव्या त्या माहिती सोबत नको ती माहिती जाते. म्हणजे बघ. हवी ती माहिती म्हणजे सिग्नल अन् नको ती माहिती म्हणजे गोंधळ.त्याला आम्ही नॉईज म्हणतो."
" समजलं मला. चार बायका एकत्र जमल्या, बोलायला बसल्या की त्यात खरं कामाचं काय अन् खोटं म्हणजे तो तुमचा नॉईज काय ते बघावं लागतं. अगदी बरोबर आजी. अग आपण व्यवहारात जो सद्गुणी असेल त्याला चांगलं म्हणतो. माणसात दुर्गुण कमी असावे असं म्हणतो. तरच चारित्र्य, व्यक्तिमत्व उत्तम समजतो. अगदी तसच.पण शंभर टक्के सद्गुण, अन् शून्य दुर्गुण हे शक्य आहे का?"
नाही रे बाबा. असा माणूस शोधून सापडणार नाही. अरे , पृथ्वीचं सोड. इथे स्वर्गात देखील सापडणार नाही. देव सुध्दा भांडतात,एकमेकाशी स्पर्धा करतात. देवांच्या बायकांचं सुद्धा पटत नाही एकमेकींशी ! लक्ष्मी सरस्वती यांच्यात तर छत्तीसचा आकडा चक्क तर आजी हे सिग्नल वाढवायचे, अन् नॉइज् कमी करण्याचे आव्हान होते आमच्या पुढे. म्हणजे यांचा जो रेशो असतो, प्रमाण असते ते महत्वाचे. ते अनेक गोष्टींवर अवलंबून असते. म्हणजे समीकरणाच्या डाव्या बाजूला हे प्रमाण, हा रेशो अन् उजव्या बाजूला ते कंट्रोल करणारे रथी महारथी. इथे समस्या ही असते की एकाला कमी करा,तर दुसरा डोकं वर काढतो. दुसऱ्याला हात लावा, गोंजारा तर तिसरा पाय पसरतो.फार गुंता गुंतीचा मामला असतो. समजलं बरं का मला. अरे बाबा, तू नवरा म्हणून बायकोला समजवायला जातोस तेव्हा हाच अनुभव येतो की नाही,सांग ? म्हणजे तू प्रेमाने एक गोष्ट सांगणार. ती त्याचा वेगळाच अर्थ काढणार. तिचा पारा वाढणार. ती तुला काहीतरी बोलणार. मग तू उलट उत्तर देणार ! सगळा खेळ बिघडणार ! अरे बाबा, संसार काय,



अन् तुझा पीएचडीचा प्रॉब्लेम काय. सगळे एकाच माळेचे मणी असं दिसतं !
आजी म्हणत होती ते खरच होतं. आमचं समीकरणाच्या डाव्या बाजूच कॉस्ट फंक्शन उजव्या बाजूच्या किती तरी प्यारामिटरस वर अवलंबून होतं. एकाला कमी करा. दुसरा डोकं वर काढणार ! दुसऱ्याला कमी जास्त करून बघा तर तिसराच डोक्याला ताप देणार. असा गुंता सोडविणार अल्गोरिथम् शोधून काढण्याला आम्ही गोंडस नाव देतो – ओपटीमायझेशन! स्याटेलाईट रिसिवर डिझाईन करताना आम्ही हाच खेळ खेळत होतो. संसारात, व्यवहारात देखील आपण असेच गुंतागुंतिचे खेळ खेळत असतो. आजीला हे सगळ माहिती होतं, वेगळ्या संदर्भात, वेगळ्या परिमाणात एव्हढच..
आजी, शाळेत शिक्षक शिकवत असताना मुलांनी गोंधळ म्हणजेच नॉइज केला तर कुणालाच काही समजणार नाही. आपण घरात एखाद्या गंभीर विषयावर चर्चा करत असताना, समस्या सोडवित असताना सारेच एकदम आवाज वाढवून बोलायला लागले तर फक्त नॉइज् वाढेल. त्यातून आपल्याला नेमके हवे ते इप्सित साधणार नाही. आमच्या इंजिनियरिंग च्या संशोधनासाठी सोडवायला घेतलेल्या समस्या देखील अशाच आव्हानात्मक असतात. समीकरण एखादंच असेल.पण ते सोडवायला कटकटीच असू शकते. शिवाय आपण जे करतो ते बरोबर आहे की नाही, निवडलेला मार्ग चुकलेला तर नाही,हे आम्हाला तपासून घ्यावे लागते. आम्ही ते पेपर प्रसिध्दी साठी पाठवतो. बाहेरचे तज्ञ ते खोलात जाऊन तपासतात. आपले मत देतात .मग आम्ही त्यात सुधारणा करतो."
"अरे लेका, आयुष्य तरी काय वेगळं असतं का? आपल्याला आपली टिमकी वाजवून चालत नाही. मोठ्याचा,जाणकारांचा सल्ला घ्यावाच लागतो. जी चूक आपल्याला दिसत नाही,जी धोका आपल्याला कळत नाही,तो थोरा मोठ्यांकडून समजतो. तुम्हाला तुमच्या कामासाठी पदवी प्रसिध्दी मिळते. आम्ही देखील जन्म भर तू म्हणतो तेच तसेच केले. आमची समस्या,आमची भाषा,आमची समीकरण वेगळी होती एव्हढच. आपण सगळे वेगवेगळी प्रमेय सोडवत असतो.हो की नाही?"
" हो आजी. तू म्हणतेस ते अगदी खरय.आज आपण चंद्रावर पोहोचलो. चंदामामा दूर नाही राहिला आता आपल्या साठी. आता तर आजी आम्ही फोनवर बोलताना बघू शकतो एकमेकांना. आठवतं तुला, मी आयआयटीला असताना तुझे कार्ड मला दहा पंधरा दिवसांनी मिळायचे. आता काही सेकंदात माहिती पोहोचते. अग माझा मुलगा, तुझा पणतू त्यावरच संशोधन करतोय."
" ऐकून फार छान वाटलं. बापसे बेटा सवाई असणारच. आता मी त्याच्या स्वप्नात जाते. अन् त्याच्या कडून त्याचं संशोधन समजावून घेते. तू हाडाचा शिक्षक.छान समजावून सांगितलं. आता मी तुझ्या पोरा समोर हे सिग्नल, नोइज्, रिसीवर, वगैरे शब्द फेकले की तो गार होणार. सांगून ठेव त्यालाही मी स्वर्गातून स्वप्नात येणार म्हणावं.तयार रहा. मी त्याची देखील परीक्षा घेईन. अरे बाबा, आम्ही तुमच्या इतके शिकलो नाही, पदव्या घेतल्या नाहीत. पण आम्हाला संसार, व्यवहार नीट कळत होता. अजाणता आम्ही तुमचं विज्ञान,तंत्रज्ञान वापरत होतो. आम्हाला डोळ्यांची,स्पर्शाची भाषा कळत होती. मला सांग, तुझ्या त्या सुपर डुपर संगणकाला कळेल डोळ्याची, स्पर्शाची भाषा? आजी म्हणत होती ते खरच होतं. आम्ही पीएचडी केली, इतरांना गाईड केली. पण आजीचा थिसीस, तिचे लॉजिक, तिचे विश्लेषण सारेच उत्तम होते.देवाला स्वर्गात इमेल पाठवली पाहिजे, तिला मानद डॉक्टरेट द्यायला !

# गौतमी पाटील समाजातील दिशाहीन प्रवृत्ती



सुरज रामचंद्र अंगुले
संपर्क : ७७१९८७६३१३

आधुनिक केसरी

**गौतमी पाटील ही एक प्रतिभावान आणि निपुण भारतीय शास्त्रीय नृत्यांगना आहे, जी कथक नृत्य शैलीतील निपुणतेसाठी ओळखली जाते. तिचा जन्म आणि संगोपन मुंबई, भारत येथे झाला. तिने लहान वयातच तिच्या आईच्या मार्गदर्शनाखाली कथ्थकचे प्रशिक्षण सुरू केले मनीषा साठे तिच्या संपूर्ण कारकिर्दीत गौतमी पाटील यांनी स्वतःला एक प्रमुख नृत्यांगना नृत्यदिग्दर्शक आणि कथक शिक्षिका म्हणून स्थापित केले आहे. तिने संपूर्ण भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर कामगिरी केली आहे. नृत्य क्षेत्रातील तिच्या योगदानाबद्दल तिला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. २०१७ मध्ये तिला संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.जो भारतातील कलाकारांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे तिला शास्त्रीय नृत्यातील उत्कृष्टतेसाठी महाराष्ट्र राज्य पुरस्कार, उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार आणि सांस्कृतिक मंत्रालयाकडून राष्ट्रीय शिष्यवृत्ती यासह इतर पुरस्काराही मिळाले आहेत.**

सुरुवात चांगली झाली परंतु आपण ज्या पंक्तीत बसलो आहोत ते स्थान तिला टिकवता येत नाही.आवाढव फिस घेऊन कार्यक्रम सादर करत असते. परंतु युवकांनी तिचा आदर्श काय घ्यायचा? की फक्त सौंदर्य बघायचं हाच मूळ प्रश्न खोलवर विचार करणाऱ्या विचारवंतांना पडला असावा. डीजेच्या आवाजामुळे खूप मोठी आरोग्याची हानी होत असते. आणि तिचे अश्लील हावभाव केल्यानंतर तरुण मुलं सुधारतील का? ती स्वतः वडिलांना सांभाळू शकत नाही, मग समाज तिचा काय आदर्श घ्यायचा म्हणून आमच्यासारख्या जळजळीत वास्तव मांडणाऱ्या लेखकाला लेखणी हातात घेण्यास भाग पडत आहे.

०२ ऑगस्ट २०२३ रोजी सोशल मीडियावर मी, कार्यक्रम बंद करणार आहे. अशी पोस्ट वाचली होती.मनाला खूप आनंद वाटला कारण तिचा कार्यक्रम म्हणजे व्यसनाला खतपाणी घालणारं आणि समाज प्रबोधन तर मुळीच नाही. कायमस्वरूपी बंद झालं तर तरुणाई सुविचाराने जगू शकेल. शहरी भागात राजकीय नेते तिचा वापर करून घेतात आणि स्वतःची पोळी भाजून झाल्यानंतर तिला ओळख ही देत नाहीत. आतापर्यंत तिचा कार्यक्रम पाहिलेल्या लोकांनी तिच्याकडून काय आदर्श घ्यायचं? चेहऱ्यावरचे हवा तर अश्लील आहेतच फिस आवाढव का घेते? जगातील तरुणाई बरबाद होण्याचं पहिलं उदाहरण म्हणजे गौतमी आहे. त्याचबरोबर तरुणाईसाठी तिचं लक्षण योग्य आहे, का? तिने आत्मपरीक्षण करावं. कारण कला ही कलाच असावी पण त्या कलेचं कल्ला होऊ नये.नाहीतर तिच्या बाबतीत घडलेल्या प्रसंगाला सामोरे जावे लागेल. गौतमी चांगलीच आहे पण मिळवलेला पैसा प्रसिद्धी आणि अहंकार सुद्धा आहे. हे रसिकांनी समजून घेतलं पाहिजे. तिचं सौंदर्य कितीही चांगलं असलं तरी सध्याच्या काळात जन्मलेली विषारी नागिन म्हणायला काहीच हरकत नाही.

तुम्ही सूक्ष्म निरीक्षण करून बघा की गाण्याची चाल आणि तिचे हावभाव जुळते मिळते लक्षण आहेत का? नाही ना मग अशा कलाकाराला आपण डोक्यावर अजिबात घ्यायचं नाही असे केल्यास दुसरी गौतमी जन्माला येऊ शकत नाही. बेधडक लिहिणं आणि वास्तव समाजासमोर मांडणं हाच माझा मूळ पिंड आहे. आणि तो मी शेवटपर्यंत जपणारच.विशेष गोष्ट म्हणजे आतापर्यंत केलेल्या कार्यक्रमात लावणी हे पारंपरिक नृत्य आहे. ते चुकीच्या पद्धतीने जनतेसमोर सादरीकरण करणे कला हा प्रकार तिच्यामध्ये दिसून येत नाही. कलेचा दुरुपयोग करत असल्यामुळे तिला अभिनेत्री म्हणता येत नाही. या मताचा मी आहे. तिच्यामुळे आज पर्यंत किती तरुणाईच जीवन उध्वस्त झालं. मग आपण तिच्यातला बाई पण जिवंत आहे का हा मूळ प्रश्न पडला आहे. फक्त पैशासाठी काहीही करू नये एवढं जरी समजलं तिला खूप फायदा होईल आणि मिळालेल्या प्रसिद्धीच सोनं कसं करता येईल त्याकडे तिने अधिक लक्ष दिले तर भर कार्यक्रमात कोणताही व्यत्याय येणार नाही. यात मुळीच शंका नाही. गौतमीच्या नृत्यामुळे तरुण मुलं बलात्कारासाठी प्रवर्त होतात. समाजात अशाने शांतता भंग पावते. मग पोलीस यंत्रणा शांतीसाठी झगडत असते. अशा तिच्या कार्यक्रमाला परवानगी देऊ नये हा उपाय समाजासाठी उत्तम असेल. वृद्ध तरुण लोक कीर्तनाला जात नाहीत पण तिच्या तमाशाचा फडात गुंग होऊन बसतात जागा सुद्धा अपुरी पडते.श्रेय तिचं आम्ही



अवश्य देऊ पण तरुणाई बिघडत आहे त्याचं काय आहे का? उत्तर सांगा बरं.अशी ही फुटकी बिंदगी समाजात विषयाची पिचकारी मारते तेव्हा आपल्याला खूप छान वाटतं. पण ज्यावेळी एखाद्या व्यक्तीचे जीवन उध्वस्त होत असेल तर त्याला जबाबदार कोण? सुंदर स्त्री असून उपयोग नाही. कला आणि विचार या जगाला उपयोगी आहेत तिच्या कलेत अजून तरी पक्व झालेली नाही. असे निदर्शनास आले आहे. म्हणून तिचं नृत्य प्रकार घातक आहे.

माझ्या मतानुसार असं नृत्य बंद करून पारंपरिक पद्धतीने केलं तर लक्ष्मी होऊ शकेल जर असेच प्रकार चालू राहिले तर याच काळातील कैकयी होऊन जाते. यामुळे ती स्वतः काळजी घेतली म्हणजे होणारा गैरप्रकार टाळू शकतो. कला तिच्याकडे आहे पण व्यवस्थित हाताळता येत नाही. म्हणून विनाकारण गोडवे गाऊन उपयोग नाही हा संदेश मी सर्व युवकासाठी देत आहे.



# ज्येष्ठ अभिनेत्री सीमा देव काळाच्या पडद्याआड

आधुनिक केसरी

आपल्या सदाबहार अभिनयाने मराठी - हिंदी चित्रपट सृष्टी गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री सीमा देव यांचं नुकतच निधन झाले सुमारे अर्धशतकाहून अधिक काळ मराठी, हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये कार्यरत राहिलेल्या सीमा देव यांनी अभिनय आणि सात्त्विक व्यक्तिमत्वाच्या बळावर आपल्या कामाचा ठसा उमटवला. मुंबईतल्या गिरगावात बालपण गेलेल्या नलिनी सराफ म्हणजेच नंतरच्या सीमा देव. त्यांनी शाळेत असल्यापासूनच नृत्याची आवड जोपासली. कल्याणजी-आनंदजींपैकी आनंदजींचा ऑर्केस्ट्रा होता त्यात त्या गाणी म्हणायच्या. गायन आणि नृत्य याची आवड बालपणापासूनच असल्यामुळे पुढे कलाक्षेत्रातील वाट खुणावू लागली होती सीमा देव या नावाला मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतंत्र ओळख मिळाली. सीमा देव यांनी भूमिका केलेल्या चित्रपटांची संख्या ऐंशीच्या घरात आहे. १९५७ साली 'आलिया भोगासी' या मराठी चित्रपटाद्वारे त्यांनी पदार्पण केले. आनंद, जगाच्या पाठीवर, मोलकरीण, यंदा कर्तव्य आहे, या सुखांनो या, सुवासिनी, हा माझा मार्ग एकला हे त्यातले काही उल्लेखनीय चित्रपट. राजेश खन्ना आणि अमिताभ बच्चन यांच्या भूमिका असलेल्या हृषिकेश मुखर्जी यांच्या 'आनंद' सिनेमातील त्यांची भूमिका छोटी परंतु संस्मरणीय आहे रमेश देव यांच्याशी त्यांचा विवाह झाला होता आणि मराठी-हिंदी पडद्यावरही या जोडीने काही चित्रपटांमध्ये पती-पत्नीची भूमिका साकारली होती चित्रपटसृष्टीसह वास्तवातील संसार देखील सुखाचा केला होता त्यामुळे त्यांना एव्हरग्रीन हिट जोडी म्हणून ओळखले जात होते त्या शांत स्वभावाच्या होत्या आणि पडद्यावरचा त्यांचा वावरही तसाच.आदर्श गृहिणी, मोठी बहीण अशा पडद्यावरच्या त्यांच्या सोज्ज्वळ प्रतिमा रसिकांच्या मनावर आजही कोरल्या गेल्या आहेत त्यांना पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या जीवनगौरव पुरस्काराने एक गुणी अभिनेत्री म्हणून सन्मानीत करण्यात आले आहे चित्रपट सृष्टीचं लेणं अशी ख्याती असलेल्या अभिनेत्रीच्या निधनाने त्यांच्या चाहत्यांसह संपूर्ण मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली आहे त्यांना विनम्र आदरांजली....!

राजू जाधव
मांगूर जि.बेळगांव



डॉ.विश्वासराव आरोटे
संपर्क : 7519989999

# लढवय्ये नेतृत्व : संजयजी भोकरे

आधुनिक केसरी

**ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत संघटनेत काम करणाऱ्या पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहेत. पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. यासाठी राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक, दैनिक महानगरी व दैनिक जनप्रवास या दैनिकांचे संपादक तथा अंबाबाई तालिम संस्था मिरज, सांगली या संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त, आमचे मार्गदर्शक संजय भोकरे प्रयत्नशील आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेला कार्याचा आढावा...**

राज्यातील बहुसंख्य वृत्तपत्रांचे संपादक तसेच पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सभासद आहेत. राज्यातील कोकण, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, नागपूर, पश्चिम महाराष्ट्र या भागात संघटनेने सभासदांच्या विविध प्रश्नांवर मोर्चे, आंदोलने उभारुन हा संरक्षण कायदा अंमलात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, आज त्याला यश मिळाले आहे. राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी पत्रकार भवन उभारले असून पत्रकारांच्या पाल्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात, उच्च शिक्षणातही सवलती मिळाव्यात तसेच राज्य मराठी पत्रकार संघाचा विस्तार विविध राज्यात करण्यासाठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोकरे प्रयत्नशील आहेत. याबरोबरच राज्यातील पत्रकारांना देशाच्या राजधानीत थांबण्यासाठी पत्रकार भवन उभारले आहे. पुणे, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर याठिकाणी देखील पत्रकार संघाच्या सभासदांसाठी पत्रकार भवन उभारले आहे. सभासदांना संघटनेमार्फत पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण, शासकीय विश्रामगृहांवर प्राधान्यक्रम, टोलनाके, सभासदांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी राखीव कोठा ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. अधिस्वीकृती धारकांनाच राज्य शासनाच्या मोफत रेल्वे, एस. टी., एअरलाईन, शासकीय विश्रामगृहांवर प्राधान्य दिले जाते त्यामुळे ग्रामीण भागातील पत्रकारांवर अन्याय होतो. आरोग्य, विमा संरक्षण व मोफत प्रवास या तीन मुद्द्यांवर केंद्र व राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून ग्रामीण पत्रकारांना या सवलतींचा फायदा देण्याचा प्रयत्न संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे. संघाचे सांगली, मिरज या ठिकाणी शैक्षणिक उपक्रम सुरु असून पुणे जिल्ह्यातही असे उपक्रम सुरु करण्याचा मानस आहे. ग्रामीण भागासह वर्तमान पत्रातील श्रमिक पत्रकार, मुक्त पत्रकार, छायाचित्रकार यांच्या संरक्षणासाठी व लढ्यासाठी संघाने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. संघटना कोणतीही असो मात्र पत्रकारांना संरक्षण, त्यांच्या कार्याची दखल घेणारी संघटना भविष्यात पत्रकारांना तारु शकते, त्यासाठी संघटनेमार्फत विभागनिहाय अधिवेशने, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, पत्रकार दिन, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा गुणगौरव व पाठीवर शाबासकीची थाप आम्ही नेहमीच देत आलो आहोत व देत आहोत. संघाने दिवंगत पत्रकारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतही दिली आहे यासाठी



भोकरे साहेबांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालुक्यात राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि सभासद आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडविण्याचे काम सातत्याने होत आहे. अनेक पत्रकारांना हलाखीच्या परिस्थितीत पत्रकार संघाकडून आर्थिक मदत केली जात आहे. संघाचे सभासदांना अधीस्वीकृत कार्ड मिळवून देण्यासाठी प्रयत्न होत आहेत. समाजातील विविध घटकांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल पत्रकार संघाकडून गौरविण्यात येत आहे यासाठी मा.भोकरे साहेबांचे मार्गदर्शन मिळत आहे. संघामार्फत उत्कृष्ट पत्रकारीता जीवन गौरव पुरस्कार, सांस्कृतिक, पत्रकारिता, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. तसेच राज्यभरात पत्रकारांची मोट बांधण्यासाठी राज्य संघटक संजय भोकरे यांच्या कल्पक नेतृत्वातून संघटनेचा विस्तार राज्याच्या पलिकडे जाऊन 'ऑल इंडिया जर्नलिस्ट'ची स्थापना करण्यात आली आहे. नवी दिल्ली येथे भव्य दिव्य इमारतीत हे कार्यालय सुरु करण्यात आले आहे.

कवि कुसुमाग्रज यांनी म्हटल्याप्रमाणे, 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेऊन फक्त लढ म्हणा' या न्यायाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ भोकरे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली उद्दीष्ट व ध्येय्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे, करीत राहणार आहे. साहेबांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# आधी आपण बदलुया; जग आपोआप बदलेल!

आधुनिक केसरी

**सातत्याने आपल्या आयुष्याबाबत नाराज, अपराधी, असमाधानी आणि अतृप्त राहून इतरांची सहानुभूती मिळवून आणि प्रत्येकाला दोष देऊन, इतरांना चुकीचे दाखवून जगण्यापेक्षा स्वतःसाठी स्वतः पुढाकार घ्या. आपल्या चुका शोधा, आपल्या चुका सुधरविण्यासाठी काम करा आणि पुढे चला. तुम्ही एखाद्यावर रागावून बसलात त्याला फरक पडत नाही, तुम्ही एखाद्याबद्दल मनात अढी ठेवली त्याला थांगपत्ता पण नाही, तुम्ही चिडलात, तुम्ही वैतागलात, तुम्ही खचलात त्याच्या गावी पण नाही! तुम्ही त्याला किती शिव्या शाप दिलेत त्याला माहिती पण नाही!! मग अशावेळी निश्चितच स्वत:मध्ये बदल घडवून आणणे हा एकमेव उपाय शिल्लक राहतो. त्यासाठी आत्मपरीक्षणाची गरज असते. या आत्मपरीक्षणाची संधी वार्षिक निरंकारी संत समागमाच्या रूपाने चालून येत असते.**

निरंकारी संतसमागम साऱ्या जगाच्या कानाकोपऱ्यात आपली प्रचंड छाप उमटवत आहे. ही माझ्या सांप्रत सद्गुरू माता सुदीक्षा सविंदर हरदेवजी महाराजांची अस्सीम कृपादृष्टी आहे. समागमाचे डोळ्यात भरणारे स्वर्गमयी दृष्ये हे संत निरंकारी मिशनच्या सेवादलाचे जवान, सेवाभावी सेवादार भगिनी आणि सेवाभावी संपूर्ण साधसंगत यांच्या त्याग, निष्काम अथक परिश्रम आणि निरंतर प्रयत्नांचे फलित आहे. म्हणूनच निरंकारी बाबा युगदृष्टा सद्गुरू हरदेवसिंहजी महाराज आपल्या अमृततुल्य प्रवचनात गौरवोद्गार काढत असत, "साध संगत ही मेरे सर का ताज है!" संत समागमामध्ये शिकण्यासारखे बरेच काही प्रसंग आणि गोष्टींचे दर्शन होत असते. त्यात प्रेम, दया, आपुलकी, सहनशीलता, समर्पण, सहकार्य, सचोटी, आदर-सत्कार, नम्रता, सेवाभाव आदी अर्थात मानवतावादी दैवी गुणांची सर्वत्र पखरण व उधळणही दिसून येते. किंबहुना हे सर्व दैवी गुण असे कोठूनच एकत्रितरीत्या मिळविता येत नाहीत. हे सगळे पाहून आपल्यात काहीतरी नक्कीच कमतरता असल्याची भावना उचंबळून येते. आपल्यात नेमकी काय काय? कशी कशी? कोणती कोणती? आणि कुठे कुठे? कसर आहे, याची चाचपणी आपल्यात करून ती यथाशीघ्र सुधारण्याची येथे सुवर्णसंधीच मिळते. या समागमाद्वारे संत सज्जनांना एकप्रकारे समदृष्टीच लाभते-

**"सम करके जो देख रही है वो दृष्टि है सन्तो की|
पूरब पश्चिम उत्तर दक्षिण कुल सृष्टि है सन्तो की|
समदृष्टि से सदा विचरते ज्ञानीजन संसार में|
कहे 'हरदेव' कि प्यार बढ़ाने लग जाते उपकार में|"
(पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र. १७१)**

संत समागमातील नियमांचे व सेवादार बंधुभगिनींच्या सूचनांचे उल्लंघन, अधाशी- हपापलेपणा, स्वार्थ, अरेरावी, उर्मट शब्दप्रयोग, अहंकार आदींना वेळीच तिलांजली देऊन कायम परोपकार व मानसन्मान राखण्याची सवय आत्मसात करणे भाग पडते. समागमातील सेवाकार्य जसे- पार्किंग, स्वागत, तपासणी, सत्संग रांग, नमस्कार रांग, चप्पल सेवा, लंगर रांग, भोजन पंगत, सवयंपाक सेवा, खोयापाया, दिव्यांग सेवा, कॅन्टिन, प्याऊ, स्वास्थ्य सेवा, शौचालय व मुत्रीघर, रहिवासी तंबू, स्वच्छता-सफाई, आदीतील सेवादरांचे समर्पण, निष्काम व निरीच्छीत भाव प्रत्येकास आकर्षित करीत असतात. येथील हे सुंदर, मनमोहक स्वर्गाहून सुखद वातावरण बघून बरेच काही शिकावयास मिळते. हे एवढे आल्हाददायक कसे काय शक्य झाले? माझ्या घरीदारी व अवतीभवती असेच स्वर्गमय वातावरण तयार होईल का? वा करता येईल का? आपल्या मनात असेही भाव- प्रश्न निर्माण झाले पाहिजेत. त्यानंतर आत्मपरीक्षण करणे सहज सुलभ होऊ शकते. म्हणून संतांनी समागमाची महती वर्णिली आहे. गोस्वामी संत तुलसीदासजी महाराजांनी रामचरित मानसमध्ये सांगितले-

**"सुत दारा और लक्ष्मी पापी के भी होय|
संत समागम हरिकथा तुलसी दुर्लभ दोय||"**

आत्मपरीक्षण म्हणजे काय? आपण सगळेच हा शब्द दैनंदिन जीवनात अनेकदा वापरतो. आपण खूपदा इतरांना सल्ले देताना, इतरांना समजावताना, अथवा कोणाशीही भांडण, मतभेद, वादविवाद झाल्यावरसुद्धा त्याला "तू आत्मपरीक्षण कर...!" असा सहजासहजी सल्ला देऊन टाकतो. दुसऱ्याला आत्मपरीक्षण करायला सांगणे खरं तर खूप सोपे असते, परंतु आपण स्वतः कितीवेळा किती गांभीर्याने आपल्या स्वतःसाठी आत्मपरीक्षण केलेले आहे? यावर विचार करणे आवश्यक आहे. आपण सगळेच आजपर्यंतच्या आपल्या आयुष्यात घडलेल्या चांगल्या वाईट घटना, प्रसंग, प्रगती, अधोगती, यश, अपयश, नफा नुकसान, फायदा यासाठी कोणाला न कोणाला जबाबदार धरत असतो. शक्यतो आपल्या जीवनात घडलेल्या अथवा घडणाऱ्या चुका, अनपेक्षित अथवा अप्रिय घटना यांत आपण इतरांना दोष देण्यात धन्यता मानतो. आपल्याला दोष देण्यासाठी आपल्या कुटुंबातले, आपल्या नात्यातील, अगदी आपल्या मागील पिढीतील जेष्ठ सदस्य, आपल्या मित्र परिवारातले, आपल्या संपर्कातले, आपले सहकारी कोणीही चालते. दोषच द्यायचाय तर तो आपल्या नशिबापासून ते देवापर्यंत सगळ्यांना देऊन आपण मोकळे होतो. समागमातील मनावर घेण्यासारखे दृश्य- म्हातारे व दिव्यांगाची मदत, गरजूंना प्राधान्य, स्वतःची तहानभूक बाजूला सारून इतरांना भरविणे, आपले दुखण-खुपणे साहून दुसऱ्याची शुषृशा करणे, पोटभर जेवू वाढणे, हे बघून आपण आपल्यातील उणीवा, दोष आणि कमतरता हेरून त्यांवर आपणच उपायही योजू शकतो. अपयशाचे, नुकसानीचे, मान हानीचे खापर इतरांवर फोडणे, दुसऱ्यांना जबाबदार धरणे, हा असा वागला, तो तिथे चुकला, तो बदलला, त्याने दगा दिला, याने धोका दिला, त्यानं फसवलं, त्यानं विश्वासघात केला, तोच चुकला, हे म्हणणं खूप सोपं आहे. आपण कुठे आहोत? आपण काय करतोय? आपण कसे वागलो आहोत? आपल्यामुळेच आपल्या स्वतःच्या वागणुकी अथवा निर्णयामुळे आपल्या आयुष्यात काही चुकलं काय? आपणच काही वादळ आपल्या आयुष्यात निर्माण केलीत का? आपल्या चुकीच्या वागणुकीमुळे माणसं दुखावलीत, दुरावलीत का? नेमक कुठे बिनसलं? आपल्या अती राग, अती घाई किंवा अती भावनांशील स्वभावामुळे आपण आज एकटे पडलोय का? अडचणीत सापडलोय का? यावर स्वतःचीच चाचपणी करणे म्हणजे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. जग सुखराशीने केव्हा भरेल? हे सत्यसम्राट संतश्रेष्ठ हरदेवसिंहजी महाराज समजावतात-

**"आत्म भाव से देख रहा जो उसको सबसे प्यार है|
उसके लिये तो सारी दुनिया अपना ही परिवार है|
नफ़रत खुद ही मिट जायेगी प्यार अगर बढ़ जायेगा|
कहे 'हरदेव' गुरू ज्ञान से दुनिया में सुख आयेगा|"
(पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र. १३१)**

आपण वर्तमानकाळात आज जे काही आहोत, ज्या काही परिस्थितीमध्ये आहोत त्यात आपलेच स्वतःचे भूतकाळात घेतलेले चांगले वाईट निर्णय, आपलीच विचारधारा, आपलाच स्वभाव, आपलीच वागणूक कारणीभूत ठरलेली असते. इतरांना आपल्या सुख दुःखाला जबाबदार धरून कुढत रडत बसण्यापेक्षा, इतरांनी आपल्या मनाप्रमाणे, अपेक्षेप्रमाणे वागावे याची वाट पाहत बसण्यापेक्षा स्वतःपासून सुरुवात करणे हिताचे राहील असे वाटते. आजच्या अतिशय व्यावहारिक जगात कोणीही तुम्हाला आधार द्यायला येईल, याची वाट पाहत बसणे म्हणजे मूर्खपणा ठरेल. आपण समोरच्याला कधीच बदलू शकत नाही आणि तसा प्रयत्न करणेही व्यर्थ आहे. कोणीही आपल्यासाठी बदलणार नाही हे सत्य स्वीकारून आपला स्वभाव, आपलीच वागणूक, आपली वैचारिकता, मानसिकता, दृष्टीकोन बदलणे रास्त राहील असे वाटते. आपली वाट, आपले धोरण आपला मार्ग सुयोग्य असेल तर कोणालाच तुम्हाला त्रास देण्याचा अधिकार राहत नाही.

समोरच्यावर आपल्या अपेक्षांचं ओझं लादून त्याचं मत आणि मन परिवर्तन करण्यात आयुष्यातील बहुमोल वेळ, श्रम आणि बौद्धिक भावनिक ऊर्जा वाया घालविण्यापेक्षा स्वतःवर काम करणे, स्वतःला बदलण्याचा प्रयत्न करणे यासाठी



वेळ देणे क्रमप्राप्त आहे. आपण जी मेहनत इतरांच्या मागे लागण्यात, इतरांच्या नादी लागण्यात, इतरांना आपली बाजू पटवून देण्यात घेतो तीच मेहनत स्वतःला सक्षम करण्यात, स्वतःला खंबीर करण्यात घेतली तर आपलं आयुष्य घडवायला इतरांच्या हातभाराची गरज पडणार नाही. दुसऱ्यावर, दुसऱ्याच्या वागणुकीवर, दुसऱ्याचे मूड, त्याच्या आयुष्यातील चढउतार यावर, दुसऱ्याच्या दैनंदिन आयुष्यावर आपले आयुष्य, आपली मानसिकता अवलंबून ठेवण्यापेक्षा, त्याच्याअनुरूप स्वतःच चांगलं वाईट घडवून घेण्यापेक्षा, त्याच्या अधिपत्याखाली आपला भावनिक तोल सांभाळत जगण्यापेक्षा स्वतःवर काम करा. आपण जेंव्हा दुसऱ्यावर आर्थिक, भावनिक, मानसिक, शारीरिक कोणत्याही कारणास्तव अवलंबून राहायला लागतो तेव्हा आपल्या विकासाच्या मर्यादा आपणच संकुचित करुन घेत असतो. त्याहीपलीकडे ज्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहिलो, तो अपेक्षित वागला नाही की त्याला दोष देऊन मोकळे होतो. वास्तविक त्याला जे योग्य वाटतंय, त्याच्या सोईच जे आहे त्यानुसारच तो वागतोय. तो आपली जी किंमत करतोय, त्याच्या आयुष्यात आपल्याला जितकं महत्व आहे त्यानुसार वागणूक आपल्याला मिळते आहे हे पचवणं आपल्याला जड जातं आणि आपण त्रागा करीत बसतो. आपला अहंकार दुखावला जातो, आपल्या आत्मसन्मानाला ठेच लागते म्हणून आपण समोरच्याला कुठंवर दोष द्यायचा? आपला मान अपमान सन्मान इतका पण स्वस्त होऊ देऊ नये अन्यथा कोणीही त्यावर आघात करेल. संताचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते. जगद्गुरू संतशिरोमणी तुकारामजी महाराजांनी सांगितले-

**"संत समागमी धरावी आवडी!
करावी तातडी परमार्थाची!!"**

सातत्याने आपल्या आयुष्याबाबत नाराज, अपराधी, असमाधानी आणि अतृप्त राहून इतरांची सहानुभूती मिळवून आणि प्रत्येकाला दोष देऊन, इतरांना चुकीचे दाखवून जगण्यापेक्षा स्वतःसाठी स्वतः पुढाकार घ्या. आपल्या चुका शोधा, आपल्या चुका सुधरविण्यासाठी काम करा आणि पुढे चला. तुम्ही एखाद्यावर रागावून बसलात त्याला फरक पडत नाही, तुम्ही एखाद्याबद्दल मनात अढी ठेवली त्याला थांगपत्ता पण नाही, तुम्ही चिडलात, तुम्ही वैतागलात, तुम्ही खचलात त्याच्या गावी पण नाही! तुम्ही त्याला किती शिव्या शाप दिलेत त्याला माहिती पण नाही!! मग अशावेळी निश्चितच स्वतःमध्ये बदल घडवून आणणे हा एकमेव उपाय शिल्लक राहतो. त्यासाठी आत्मपरीक्षणाची गरज असते.

सतत इतरांना जबाबदार धरून आपलं आयुष्य दयनीय करुन घेण्यात, पश्चाताप आणि मनस्ताप करुन घेण्यात व्यर्थ वेळ घालविण्यापेक्षा स्वतःवर काम करायला सुरुवात करा. तुम्ही कोणामुळे किती दुःखी झाला आहात, कोणाच्या वागण्याने दुखावले गेले आहात, कोणासाठी थांबलेले आहात, कोणाची वाट बघत आहात याचेशी कोणालाही काहीही घेणंदेणं नसतं. जो तो आपलं आयुष्य मजेत आणि मर्जीने जगण्यात व्यस्त असतो. प्रत्येकाला त्याचं आयुष्य प्रिय असतं, त्याचं स्वतःचं विश्व प्रिय असतं. आपण कुणासाठी तापदायक, त्रासदायक व्हायला लागलो की ते आपल्याला आपली पायरी दाखवतात, अपमानित करतात. त्यामुळे आपल्याला सुखानं जगायचं असेल आणि दर्जेदार जीवन जगायचं असेल तर कोणाच्याही कोणत्याही वागणुकीचा आपल्या जीवनावर परिणाम न होऊ देणे, सातत्याने स्वतःचे मूड, मानसिकता, भावनिकता बिघडू न देणे अत्यंत महत्वाचे आहे. हे जर साध्य करायचे असेल तर, स्वतःच्या स्वभावावर स्वतःच्या वागणुकीवर स्वतःच्या मनावर आणि स्वतःच्या विचारसरणीवर काम करणे अपेक्षित आहे. गुरुकृपेने प्रभूप्राप्ती आणि सुखी जीवनाचे रहस्य शहंशाह अवतारसिंहजी महाराजांनी सांगितले-

**"नीच निमाणा गुण नहीं पल्ले आपे तरस तूं कीता ए|
तेरी रहमत दे सदके मैं जीवन दा रस लीता ए|
मुरशद मेरे रहमत कीती चरनां दे नाल लाया ए|
रमया राम अवतार गुरू ने छिन दे विच विखाया ए|"
[पवित्र सम्पूर्ण अवतार बाणी: पद क्र. २७१]**

आपल्या मनस्थितीला, आपल्या परिस्थितीला आपण स्वतः कारणीभूत आहोत हे अगोदर मोठ्या मनाने स्वीकारता आलं पाहिजे. ज्यावेळी आपण आपली सत्य परिस्थिती स्वीकारू आणि त्याची जबाबदारीदेखील स्वतः घेऊ तेव्हा जगणं सोपं होण्यास मदत होईल. स्वतःचे ध्येय स्पष्ट ठेवणे, त्याच दिशेने योग्य मार्गांवरून वाटचाल करणे, आपल्याकडून कोणालाही न दुखावणे, कोणाच्याही त्रासाला कारणीभूत न होणे, कोणत्याही चुकीच्या व्यक्ती अथवा परिस्थितीमध्ये आपली भावनिक मानसिक तसेच आर्थिक गुंतवणूक पूर्ण विचार केल्याशिवाय न करणे, प्रत्येक नातेसंबंध दर्जेदार पद्धतीने हाताळण्याचा निदान आपल्याकडून प्रयत्न होणे हे काही पायाभूत तत्व अंगीकारून आपलं आयुष्य आपण तणाव मुक्त करू शकतो. आपल्याला कुठे बदलणे आवश्यक आहे, काय बदलणे गरजेचे आहे यावर अभ्यास करून स्वतःचं असं अंतर्मनात स्वतंत्र व्यक्तिमत्व आणि स्वतःभोवती असं वलयं तयार करणं आवश्यक आहे. जिथे कोणीही, कोणाचीही वागणूक, कोणाचाही स्वभाव तुम्हाला विचलित करू शकणार नाही. सगळ्यांमध्ये राहून देखील अलिप्त राहणं, शांत राहणं, संयमी राहणं हे आव्हान जो पेलू शकतो; तो स्वतःला नक्कीच बदलू शकतो. निरंकारी संत समागम ही माणसाला माणूस बनण्यास लाभलेली एक सर्वोत्तम संधी आहे. एवढेच नव्हे, तर हे समागम म्हणजे सद्गुरूने उघडलेला माणूस घडविण्याचा कारखानाच आहे, हे नक्की!

# संजय राऊतांचा मेंदूच भरकटलेला : राम कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** ठाकरे शिवसेनेचे प्रवक्ते खा.संजय राऊत यांचं डोकं वर्तमान स्थितीत भरकटलं असल्याने आपल्या देशाच्या चंद्रयानचं यशस्वी स्पॉट लँडिंग होवुन देखील त्यांना त्यातही राजकारण दिसणं हा नतद्रष्टपणा खऱ्या अर्थाने भारतीय शास्त्रज्ञाच्या आत्मबलाचं खच्चीकरण करणारंच म्हणावे लागेल. शास्त्रज्ञाच्या यशस्वी मोहिमेला आपल्याच मुखपत्राच्या दैनिकात संपादकीय अग्रलेख लिहुन त्यांनी दाखवलेला मनाचा कोतेपणा ज्याच्यातुन किती संकोचित वृत्ती हालकट असावी ?हेच अवलक्षण समोर येतं. चंद्रयान स्पॉट लँडिंग यशस्वी झाल्यानंतर अवघ्या काही क्षणात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेस दौऱ्यावर असताना भारतमातेचा ध्वज अर्थात तिरंगा फडकवतात आणि भारतीय शास्त्रज्ञाला शाब्बासकी देताना देशवासियांना संबोधीत करतात. या गौरवशाली इतिहासालाही अग्रलेखातून राऊतांसारखे ज्याचा उल्लेख देशद्रोही असा केला तरी चुकीचे नाही. काळा डाग लावत असतील तर त्यांचं डोकं भरकटलेलं त्याहुन अधिक मेंदु सडलेलाच म्हणावा लागेल या शब्दांत भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी हल्ला चढवला. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कुलकर्णी म्हणतात की, बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास भारतीय शास्त्रज्ञांनी जगाच्या पाठीवर गौरवशाली इतिहास घडवला. ज्या इतिहासाचे साक्षीदार आपण सारेच आहोत. देशवासियांचे डोळे चंद्रावर सोडलेल्या यानाकडे लागले. काळजाचा ठोका चुकावा तसे ते शेवटचे पंधरा मिनिट अन त्यात चंद्रयान यशस्वी झाले. भारतीय शास्त्रज्ञांनी त्या यशस्वी मोहिमेनंतर जल्लोष साजरा केला. भारतमातेचा सुपुत्र असलेल्या अगदी तळागाळातील माणसानं देखील या इतिहासाचं कौतुक केलं. प्रत्येकाची छाती फुगुन येईल असा हा दिवस. आपल्या देशाचे पंतप्रधान परदेशावर असताना देखील दौऱ्यातील दोन तास त्यांनी बाजुला काढत चंद्रयानचं प्रक्षेपण पाहिलं. बुधवारी सायंकाळी पाच नंतर प्रत्येकाच्या अंगावर शहारे उभा रहात होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे नेतृत्व करताना भारतीय शास्त्रज्ञाचं वेळोवेळी वाढवलेलं मनोबल आणि दिलेली प्रेरणा याची नोंद घ्यावीच लागेल. इतिहास घडताच आपण साऱ्यांनी पाहिलं की पंतप्रधान मोदीजींनी हातात तिरंगा घेत तब्बल दोन मिनिट फडकवत होते. एव्हाना त्यांनी काही क्षणातच या मोहिमेचे आणि शास्त्रज्ञाचे कौतुक करण्यासाठी भाषणही केले.

# मतिमंद मुलीवर अत्याचार, नराधमास शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** अल्पवयीन मतिमंद मुलीवर शारीरिक अत्याचार करणाऱ्या नराधम युवकास खामगाव न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. खामगाव न्यायालयाचे विशेष न्यायाधीश पी. पी. कुळकर्णी यांनी हा गुन्हेगारांना जरब बसविणारा निकाल दिला. मागील सुमारे पाच वर्षांपूर्वी आरोपी राम भारत पालकर (२७) याने पीडितेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत तिच्यावर अत्याचार केला.

या प्रकरणी ९ नोव्हेंबर २०१८ रोजी पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी डी. बी. वाघमोडे यांनी तपास करून खामगाव न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायाधीशांनी सरकार पक्षातर्फे सादर करण्यात आलेले पुरावे व साक्षी तसेच युक्तिवाद लक्षात घेऊन निकाल दिला. यामध्ये पाच डॉक्टरांच्या साक्षी निर्णायक ठरल्या.

# वडोदबाजार हद्दीतील चोरट्यांना पोलीस अधीक्षकांनी केले हद्दपार

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** पोलीस अधीक्षक कलवानिया यांनी गुन्हेगारी थांबविण्यासाठी सक्त व कठोर धोरण अवलंबून चार सराईत चोरट्यांविरुद्ध एम.पी.डी.ए. तसेच हद्दपारी प्रमाणे कारवाई करून सराईत गुन्हेगार व त्यांचे गुन्हेगारी वर अंकुश ठेवला आहे. याच अनुषंगाने पोलीस ठाणे वडोदबाजार हद्दीतीत राहणारे 04 सराईत चोरटे ज्यात 1) अमर सुरजप्रसाद दुबे वय 28 वर्ष रा. जळगाव ह.मु. खामगाव ता. फुलंब्री (टोळी प्रमुख) 2) आकाश सुरजप्रसाद दुबे वय 30 वर्ष रा. जळगाव ह.मु. ह.मु. खामगाव ता. फुलंब्री 3) सागर राजु सोनवणे वय 30 वर्षे रा. खामगाव ता. फुलंब्री 4) संतोष संजय सोनवणे वय 22 वर्षे रा. खामगाव ता. फुलंब्री यांनी पोलीस ठाणे वडोदबाजार, फुलंब्री, सिल्लोड शहर, खुलताबाद या ठिकाणी एकत्रीतपणे टोळीने शेतातील विहीरीवरिल बसविलेल्या इलेक्ट्रीक मोटारी नियोजितपणे चोरी केल्याचे अनेक गुन्हया सह इतर चोरीचे सुध्दा गुन्हे दाखल असुन नमुद गुन्हेगार यांच्यावर दाखल गुन्हयांचा आलेख हा वाढतच चाललेला होता. मुळे पोलीस ठाणे वडोदबाजार येथील सपोनि विलास मोरे यांनी त्यांचा हद्दपार प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक यांना सादर केल्याने मा. पोलीस अधीक्षकांनी त्यांच्या वाढत्या कारवाई रोखण्याचे अनुषंगाने त्यांचेवर वचक निर्माण होण्यासाठी अश्या प्रकारे गंभीर गुन्हे करणा-या टोळी विरूध्द सक्त भुमिका घेत या 04 गुन्हेगारांना महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 चे कलम 55 (1) प्रमाणे जिल्हा व शहरा बाहेर हद्दपार केले.



# कोलते टाकळी ते शिर्डी पायी दिंडी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील कोलते टाकळी येथून साईबाबा यांच्या आशीर्वादाने शिर्डी येथे दरवर्षी पायी दिंडी सकाळी कोलते टाकळी परिसरातून रवाना झाली संपूर्ण गावातून पालखी शोभा मिरवणूक करण्यात येऊन गजरात जयघोष करून ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थिती होत पायी दिंडी देवगिरी सहकारी कारखाना येथे हॉटेल जळधारा खुलताबाद रोड फुलंब्री येथे त्यांना फराळ करून स्वागत करण्याचा दरवर्षी पालखीची सेवा करीत असतात यावेळी तुकाराम चिकटे मनोज चिकटे रावसाहेब तांबे सागर गाडेकर राहुल गाडेकर गणपत केत सुराज श्री सागर शंकर कदम ऋषी जाधव आदींची उपस्थिती होती.



# कृषी विभागाची आढावा सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळ सदृश्य परिस्थितीबाबत मा. आमदार हरिभाऊजी बागडे यांनी कृषी विभागाची आढावा व मार्गदर्शन सभा तहसील कार्यालय येथे दिनांक 25 ऑगस्ट 2023 रोजी घेतली. सदर सभेसाठी तालुका शेतकरी सल्ला समितीचे सदस्य सुद्धा उपस्थित होते. दुष्काळ सदृश्य परिस्थितीत पावसाच्या 21 दिवसापेक्षा जास्त असलेल्या खंडाचे दुष्परिणाम पिकांवर दिसू लागलेले असून त्यावर पीक विमा योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच तालुक्यातील गावनिहाय पर्जन्यमापकाच्या नोंदी जास्तीत जास्त अचूकपणे कशा घेतल्या जातील याकडे लक्ष देऊन काम करावे हे पण जाहीररित्या सांगितले. तालुका शेतकरी सल्ला समितीच्या मार्फत नवीन तंत्रज्ञान राबवलेल्या शेतकऱ्यांचे तंत्र इतरांनी पण चांगल्या पद्धतीने आत्मसात करून आपली शेती पद्धती सुधारावी व जास्तीत जास्त उत्पन्न काढण्यावर भर द्यावा. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगात फुलंब्री तालुका अग्रेसर असल्याचे सर्वांना सांगून या कामाबाबत सभेत त्यांनी सर्वांसमक्ष समाधान व्यक्त केले. असेच काम उद्योग क्षेत्रात तालुक्याचे वाढावे ही अपेक्षा पण व्यक्त केली. सदर सभा सुरू झाल्यावर तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले यांनी सभेचे अध्यक्ष मा.बागडे नानांचे तालुक्याच्या वतीने स्वागत केले. भारत कासार, तालुका कृषी अधिकारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन व आभार निवृत्ती जोरी, मंडळ कृषी अधिकारी यांनी केले. या सभेसाठी सुहास शिरसाठ, जिल्हाध्यक्ष भाजपा, सर्जेराव मेटे, माजी पं.स. सभापती, विनोद मानकापे, कल्याणदादा चव्हाण, तानाजी पवार, पंढरीनाथ देवरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



# संत नरहरी महाराज जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शुक्रवार रोजी रामनगर येथे संत शिरोमणि श्री नरहरी महाराज याची 830 वी जंयत्ती निमीत्त महाराजाच्या प्रतिमेचे पुजन करून त्याच्या जिवनावर प्रकाश टाकण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गाडेजडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते आत्माराम गाडेकर, या भागातील काँग्रेसचे कार्यकर्ता सुभाष राव पांडभरे, अंकुशराव चौधरी, भाकप शहरसचिव भास्कराव लहाने साहेब सोनार समाजाचे सामाजिक कार्यकर्ते व कॉग्रेस ओबीसी सेलचे प्रमुख अनिल माळोदे, सागर खंदारकर, एक विचार एक मंच प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोज पळसकर, रवि गाडेकर, सुभाष पडोळे सुभाष बिनोरकर, आशुतोष वाकोडे आदी ऊपस्थित होते. सुञसंचालन प्रकाश मालवनकर, आभार संतोष भांडेकर यांनी मांडले. नरहरी महाराज यांच्या जिवनावर सुभाष पांडभरे साहेब यांनी विस्तुत माहीती दिली.



# पंचप्रण शपथेतून चंद्रपूरला प्रगत करण्याचा संकल्प करुया : मुनगंटीवार



आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचा समारोप 'मेरी माटी मेरा देश' (माझी माती माझा देश) या अभिनव उपक्रमातून होत आहे. भारतमाता आणि या देशाच्या मातीचे आपल्यावर नेहमीच ऋण राहिले आहे. त्यामुळे आता मातेसोबत मातीच्याही रक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे. आज आपण माती हातात घेऊन पंचप्रण शपथ घेतली. ही केवळ शपथ नसून या माध्यमातून चंद्रपुरला देशात सर्वात प्रगत जिल्हा म्हणून नावलौकीक मिळवून देण्याचा आपण संकल्प करुया, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.बल्लारपूर मार्गावरील डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम उद्यान येथे 'मेरी माटी मेरा देश' या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचा समारोप झाला. त्यावेळी ना. श्री. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदन सिंग चंदेल,जिल्हाधिकारी विनय गौडा, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा,भाजपा महानगर अध्यक्ष राहुल पावडे,मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मरुगानंथम एम., मनपा आयुक्त विपीन पालीवालयांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा प्रशासनाने 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात अतिशय उत्साहाने राबविल्याबद्दल ना. श्री. मुनगंटीवार यांनी कौतुक केले. श्री. मुनगंटीवार म्हणाले, 'आपण शिलाफलकांवर विरांची नावे लिहिली, त्यांना नमन केले. वसुधा वंदन अंतर्गत वृक्षारोपण, पंचप्रण शपथेतून देशाच्या विकासात योगदान देण्याचा संकल्प, आदी बाबी या उपक्रमांतर्गत करण्यात आल्या. 'सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास और सबका सन्मान' यानुसार देश प्रगतीपथावर जात आहे. देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात देशाला प्रगत केले. आपला देश हा नेहमीच धनसंपन्न, गुणसंपन्न, ज्ञानसंपन्न होता आणि राहील. मात्र त्यासाठी आपल्याही योगदानाची आवश्यकता आहे.' तत्पूर्वी पालकमंत्री यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उद्यानात उभारण्यात आलेल्या शिलाफलकाचे अनावरण, वसुधा वंदन अंतर्गत वृक्षारोपण, ध्वजारोहण करण्यात आले. गोवा मुक्ती संग्रामातील डॉ.शेषराम बळीराम इंगोले, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सुशिलाबाई आनंदराव उरकुडे, उषाताई कृष्णा हजारे, लक्ष्मीबाई पांडुरंग चौधरी, विठाबाई लक्ष्मण काहीलकर, रामाजी बालाजी बडघरे, विजय बाबुराव थोरात, शांताबाई काळे तसेच शहीद पोलीस साधूजी नारायण चांदेकर, प्रकाश जयराम मेश्राम, शहीद सैनिक गोपाल भिमनपल्लीवार, योगेश वसंत डाहुले, प्रवीणकुमार कोरे तसेच शौर्यचक्र प्राप्त शंकर गणपती मेंगरे यांच्यासह शहीद कुटुंबीयांचा सत्कार पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आला.

# ॲड. रूपाली खाडे यांची एमपीएससीमार्फत साहाय्यक सरकारी अभियोक्तापदावर निवड

आधुनिक केसरी न्यूज



**पाटोदा :** जिल्ह्याच्या सुपुत्री ॲड. रूपाली कैलास खाडे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सहाय्यक सरकारी अभियोक्ता (गट - अ) राजपत्रित या पदावर निवड झाली आहे. ॲड. खाडे यांचे आजोबा गोपीनाथ बाबुराव खाडे हे पाटोदा तालुक्यातील करंजवन या छोट्याशा गावातून मुंबई पोलीस मध्ये १९६५ साली भरती झाले. त्यांनी अतिशय हलाखीच्या परिस्थितीला सामोरे जात आपल्या मुला-मुलींना शिकवले परंतु त्यांचे सरकारी अधिकारी बनण्याचे स्वप्न मुलांकडून पूर्ण होऊ शकले नाही. म्हणूनच गोपीनाथ खाडे यांनी आपली नात रूपालीस लहानपणापासूनच सरकारी अधिकारी बनण्यासाठी प्रोत्साहित केले व ॲड. रूपाली खाडे यांनी आपल्या आजोबांचे स्वप्न पहिल्याच प्रयत्नात वर्ग १ अधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन पूर्ण केले. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की निकालानंतर एक महिन्यातच श्री गोपीनाथ खाडे यांचे निधन झाले.

ॲड. रूपाली यांनी कायद्याचे शिक्षण BLS LLB शासकीय विधी महाविद्यालय (GLC) चर्चगेट मुंबई येथून पूर्ण केले व कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण LLM मुंबई विद्यापीठातून पूर्ण केले. त्यानंतर ॲड. खाडे यांनी कुर्ला मेट्रोपोलिटन कोर्ट आणि जिल्हा व सत्र न्यायालय मुंबई येथे वकिली व्यवसाय केला. ॲड. खाडे यांनी सोबतच परीक्षेची तयारी करून यश संपादन केले त्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. ॲड. रूपाली खाडे यांना या परीक्षेसाठी पुणे येथील ॲड. गणेश शिरसाट सर व प्राध्यापक कराड सर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच ॲड. रुपाली यांनी परीक्षेत निवड होऊन 'आजोबांचे स्वप्न पूर्ण केले' हीच आपल्या आजोबांसाठी खरी आदरांजली असल्याचे सांगितले.

# वाहनचालकांवरील थकीत दंड होणार कमी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** वाहतूक नियमभंगाच्या थकीत दंड प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांसाठी मदत केंद्र सोमवारपासून (२८ ऑगस्ट) सुरू करण्यात येणार आहे. वाहनचालकांवर असलेला थकीत दंड तडजोडीत कमी करण्यात येणार आहे. वाहनचालकांनी येरवडा येथील वाहतूक उपायुक्त कार्यालयात उपस्थित रहावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून ९ सप्टेंबर रोजी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. लोकअदालतीत प्रलंबित खटले तडजोडीने मार्गी लावण्यात येतात. वाहतूक नियमभंगाच्या थकीत दंडाचे प्रमाण मोठे आहे. थकीत दंडाची रक्कम कमी करणे, तसेच वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यासाठी पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेकडून वाहनचालकांसाठी मदत केंद्र सुरू (हेल्प डेस्क) सुरू करण्यात आले आहे.



# पावतु सामाजिक संस्था मोरावेच्या वतीने गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारी मोरावे नवी मुंबई येथील पावतु सामाजिक संस्था मोरावे. या संस्थे मार्फत कोरोना च्या काळात सुद्धा भरीव असे सामाजिक कामे करण्यात आली. आदिवासी बांधवाना संसार उपयोगी सामान, अन्नदान अशी सामाजिक कामे करीत असताना मोरावे गावातील 99 निराधार महिलांना दरमहा 1200 रुपयांचे आर्थिक मदत करून त्यांच्या कुटुंबियांना आधार देण्याचे काम या संस्थे मार्फत चालू आहे.नुकताच या संस्थे मार्फत सामाजिक बांधिलकी जपत राजिप शाळा मोरावे येथील शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी साई देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष रवीशेठ पाटील, पालतू सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राहुल म्हात्रे, उपाधक्ष्य वर्षा म्हात्रे, सचिव विनय म्हात्रे,सदस्य जनार्दन म्हात्रे, चंद्रकांत म्हात्रे, शांताराम पाटील, राधिका राहुल म्हात्रे, करिश्मा म्हात्रे, अश्विनी म्हात्रे, काशिनाथ म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, वृषाली पाटील, मुख्याध्यापक दिनेश नांदगावकर, शिक्षिका वेदिका मयेकर, तन्वी त्रिलोकेकर,यश म्हात्रे, नीरज म्हात्रे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# तलवार बाळगून फेसबुकवर फोटो अपलोड करणारा अखेर जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे मा. पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी जिल्हयातील अवैध्यरित्या शस्त्र बाळगणारे इसमांचा शोध घेऊन त्यांना जेरबंद करण्याबाबत सुचना सर्व प्रभारी अधिकारी यांना दिल्या होत्या

यावरुन सिल्लोड उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे यांनी अशा गुन्हे करणारे इसम यांचा शोध कसा घ्यावयांचा याबाबत मार्गदर्शन केले. यावरुन फर्दापूर पोलीस स्टेशनचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे व त्यांचे पथकातील पो. ना. निलेश लोखंडे व योगेश कोळी यांचे कडे फर्दापुर फेसबुक सर्कलमध्ये एक इसमांचा फोटो सारखा व्हायरल होत असतांना माहिती मिळाल्यावरुन आरोपी दीपक जर्नाधन लव्हाळे, वय 35 वर्षे रा. फर्दापूर यांने फेसबुक अंकाऊटवर विस इंची तलवार घेवुन फोटो टाकलेला होता व तो फेसबुक अंकाऊटवर व्हायरल होत होता. सदर इसमाकडे चौकशी केली असता त्यांने तलवार ही काढुन दिली असुन त्यांच्या विरुद्ध फर्दापूर पोलीस स्टेशन ला गु.र.नं. 124 / 2023 शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 4 व 25 प्रमाणे गुन्हा दिनांक 25/08/2023 रोजी दाखल करण्यात आला असुन त्यांला सदर च्या गुन्हयामध्ये अटक करण्यात आलेली आहे. तसेच यापूर्वी पण फर्दापूर गांवामध्ये एक इसम आरोपी विशाल राजु शिंदे वय 35 वर्षे रा. फर्दापुर यांने पण तलवार घेऊन फेसबुकवर नृत्य केल्याचा व्हिडीओ व्हायरल केला होता त्यांचे विरुध्द पण फर्दापुर पोलीस स्टेशनला गु.र.नं. 105/2023 शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 4 व 25 प्रमाणे गुन्हा 22/07/2023 रोजी गुन्हा दाखल आहे. फर्दापूर पोलीस दलातर्फे सर्वांना आवाहन केले जाते की, मोबाईल मध्ये सोशल मीडियाचा उपयोग शस्त्र घेवुन केक कापणे, शस्त्रासह नृत्य करणे, शस्त्र घेऊन फोटो काढणे व ते स्वतःजवळ विनापरवाना बाळगणे हा शस्त्र अधिनियम 1959 अन्वये गुन्हा आहे. तसेच दोन धर्मामध्ये तेड निर्माण होईल किंवा एखादयांची भावना दुखावेल असा प्रकारचा स्टेटस किंवा कमेंट करणे हा पण भारतीय दंड सहिंता 1860 कायदयांन्वये गुन्हा आहे. सोसल मीडीयाचा उपयोग चांगल्या कामासाठी करावा व चांगल्या उददेशासाठी करावा असे पण आवाहन सपोनि भरत मोरे यांनी केले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# सांस्कृतिक कार्यक्रमातून देशभक्तीचा जागर

आधुनिक केसरी न्यूज


**चंद्रपूर :** 'मेरी माटी, मेरा देश' या उपक्रमांतर्गत राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपुरात 'साद सह्याद्रीची...भुमी महाराष्ट्राची' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले होते. चंद्रपूरकरांनी उत्साहपूर्ण वातावरणात देशभक्तीचा जागर करत या कार्यक्रमाचे तोंडभरून कौतुक केले व डोळ्याचे पारणे फिटल्याची भावना व्यक्त केली. 23 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6.05 वाजता भारताच्या वैज्ञानिकांनी चांद्रयान – 3 हे मिशन यशस्वी करून दाखविले. या गोष्टीचा जोश नागरिकांमध्ये होताच. त्यानंतर लगेच सुरू झालेल्या 'साद सह्याद्रीची... भुमी महाराष्ट्राची' या रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमात डौलाने फडकणारा तिरंगा आणि नागरिकांचा उत्साह अभुतपूर्व होता. सांस्कृतिक विभाग (म.रा.), जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद व चंद्रपूर महानगर पालिकेच्या वतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन चांदा क्लब ग्राऊंडवर करण्यात आले होते. प्रसिध्द अभिनेता श्रेयस तळपदे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि पुजा सावंत तसेच प्रसिध्द गायक नंदेश उमप यांच्यासह जवळपास 300 कलाकारांनी आपल्या सादरीकरणातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यात शिवराज्याभिषेक सोहळा, भारतीय स्वातंत्र्याचा लढा, वारक-यांच्या वेशातील सादरीकरण, देवीचा जागर, अस्सल मराठी नृत्य, पोवाडा, सीमेवरील जवानांच्या वेशातील सादरीकरण अशा विविध नृत्यांनी आसमंत दणाणला. चांद्रयान मोहिमेचे यश, वैज्ञानिकांचे परिश्रमाचे फळ आणि देशभक्तीचा जागर असा त्रिवेणी संगम बुधवारी चंद्रपुरात अनुभवायला मिळाला. चांदा क्लब ग्राऊंड येथे 'साद सह्याद्रीची... भुमी महाराष्ट्राची' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात आपला देश हा सर्वात प्रथम असला पाहिजे. भयमुक्त, भूकमुक्त, विषमतामुक्त, समतायुक्त भारत आपल्याला घडवायचा आहे. त्यासाठी प्रत्येकाचे योगदान आवश्यक आहे. सद्यस्थितीत आपण भद्रावती येथून सीमेवरील आपल्या सैन्यासाठी बॉम्ब पाठवितो. चंद्रपुरात 122 एकर मध्ये असलेल्या सैनिक स्कूलमधून भविष्यात देशाच्या रक्षणासाठी हे सैनिक जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपले चंद्रपूर नेहमी अग्रेसर असले पाहिजे, चंद्रपुरचा गौरव वाढावा, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे आवाहनही पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केले. तत्पूर्वी पालकमंत्र्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने 'साद सह्याद्रीची....भुमी महाराष्ट्राची' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे दिग्दर्शक सुभाष नकाशे, अभिनेता श्रेयस तळपदे, अभिनेत्री पुजा सावंत, सोनाली कुलकर्णी आणि गायक नंदेश उमप यांचा ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



**2047 च्या आत्मनिर्भर भारतासाठी चंद्रपुरचे योगदान राहील :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 9 ऑगस्ट 2023 पासून 'मेरी माटी मेरा देश' (माझी माती माझा देश) या उपक्रमाला सुरुवात झाली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने गावपातळीपर्यंत हा उपक्रम अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सन 2047 रोजी भारतीय स्वातंत्र्याला 100 वर्षे पूर्ण होणार आहे. 2047 च्या आत्मनिर्भर भारतासाठी चंद्रपुरचे नक्कीच योगदान राहील, अशी अपेक्षा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

# सत्यजीत तांबे यांचे काँग्रेसमध्ये परतण्याचे संकेत

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** नाशिक पदवीधर निवडणुकीदरम्यान सत्यजित तांबे यांनी बंडखोरी केल्यानंतर, काँग्रेस पक्षाने सत्यजीत तांबे यांच्यावर कारवाई केली होती. तरीदेखील पदवीधर मतदारसंघातून प्रचंड मतांनी सत्यजीत तांबे हे निवडून आले होते. या निवडणुकीला जवळपास सहा महिन्यांचा कालावधी होऊन गेला. त्यादरम्यान राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडल्या, पण सत्यजित तांबे नेमके कोणत्या पक्षात जाणार हे अद्यापही निश्चित झाले नाही. या राजकीय घडामोडीदरम्यान सत्यजीत तांबे पुणे दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी काँग्रेस प्रवेशावर भाष्य केले आहे.

काँग्रेस पक्षात जाणार का असे विचारले असता तांबे म्हणाले की, काँग्रेसमधील काही ठराविक लोकांनी मला लक्ष्य करून बाहेर काढले. आमच्या रक्तात आणि विचारात काँग्रेस आहे. मला पक्षातून काही लोकांनी बाहेर ढकलून दिले असले तरी आता पक्षश्रेष्ठींची जबाबदारी आहे की, मला त्यांनी परत बोलावले पाहिजे. पण अद्यापपर्यंत अशी कुठलीही हालचाल झालेली नाही. निवडणुकीच्या काळात जो काही एपिसोड झाला तो आपल्या सगळ्यांच्या समोर आहे, कशा पद्धतीने माझ्याबरोबर राजकारण झाले आणि कशा पद्धतीने पक्षातून बाहेर ढकलण्यात आले, मी काही एकटाच नाही, तर देशात माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते आहेत. त्यांना नेत्याकडून ठरविक ठिकाणी टार्गेट करून ढकलण्यात येत आहे. ही चिंतेची बाब असून यावर काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी विचार करणे गरजेचे असल्याची भूमिका मांडत सत्यजीत तांबे यांनी काँग्रेस पक्षात परतण्याचे संकेत दिले आहेत.



# तालुका प्रमुखपदी सोनाली धाटबळे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री तथा रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे तसेच कन्नड तालुकाप्रमुख केतन काजे यांच्या हस्ते सोनाली धाटबळे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

सदर नियुक्ती शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे यांच्या शिफारसीवरुन जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपुत व महिला आघाडी जिल्हा संघटक शिल्पाराणी वाडकर यांनी केली. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार व धर्मविर स्व.आनंद दिघे साहेब यांचा विचार यांच्याशी एकनीष्ठ राहुन, राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी सरकारच्या माध्यमातुन, शिवसेना पक्षाने केलेले कार्य, महिला-भगिनींपर्यंत पोहोचवण्याचे काम आपण करावं असे सांगत पुढील वाटचालीस मंत्रीमहोदयांनी शुभेच्छा व आशिर्वाद दिलेत.यावेळी उपतालुकाप्रमुख काकासाहेब काळे, विभाग प्रमुख सोमनाथ जाधव, उपविभाग प्रमुख प्रविन धाटबळे, निपाणीचे उपसरपंच प्रतापराव सुर्यवंशी, सरपंच गणेश गिधे, वाल्मीक खैरनार, अप्पासाहेब शिंदे, गोरख धाटबळे व शिवसैनीकांची उपस्थिती होती. या निवडीचे जिल्हाप्रमुख-राजेंद्र जंजाळ, भरतसिंग राजपुत, जिल्हा संघटक-शिल्पाराणी वाडकर, तालुका प्रमुख-केतन काजे, उपजिल्हाप्रमुख-डॉ. मनोज राठोड सभापती कृ.ऊ.बा.कन्नड, केशव राठोड, जि.प.सदस्या-शुभांगीताई काजे, सर्व उपतालुकाप्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख व शिवसैनिकांनी स्वागत केले.

# मंगळागौरीतून जपली सांस्कृतिक कला

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** श्रावण महिन्यातील पहिली मंगळागौर उत्सव शहरातच नव्हे पूर्ण महाराष्ट्रभर साजरा झाला. छत्रपती संभाजी नगरातील बजरंग चौका जवळील टेलिकॉम सोसायटीत कलाश्री ग्रुपचे सादरी करणात महिलांनी खेळ दाखवले. नवविवाहितांनी सुरुवातीस मंगळागौरी व महादेवांची विविध पूजा केली व त्यानंतर सुरू झाला खरा गाण्यांचा व आपली संस्कृती जपण्याचा 42 प्रकारच्या खेळातून उपस्थिता मधे रोमांच उभा राहिला फुगडीचे विविध प्रकार दंड, कंबर, त्रिफुला, फुलपाखरू, गवळण, जात, केरसुनी, सासु सुनेचे (विनोदी) भांडण, सुप, लाटणं, तवा, गाठोड आदीवर भरभरून गाण्याची कार्यक्रम झाले. गेल्या काही वर्षात मंगळागौरी केवळ सणापूर्तीच दिसून यायची आज प्रत्येक शहराच्या ठिकाणी 18 ते 20 ग्रुप मंगळागौरीची व्यावसायिक कार्यक्रम करण्या सोबतच कलागुणांना वावही देतात पारंपरिक नऊवारी साड्या, दागिन्यांचा साज घालून स्फूर्तीने केलेले खेळ आनंददायी ठरतात नवविवाहितच नव्हे तर घरातील आजीबाई विविध दागिने घालून नटल्या होत्या सासु सुनेची फुगडी नाच ग घुमा नाचू मी कशी, किस बाई किस दोडका किस माझी आई मोठी की तुझी आई मोठी असे अनेक एका मागून एक सुंदर गाण्यांचा उपस्थित महिलांनी आनंद घेतला तर असा एकामागून एक गाण्यांचा खजिना वृषाली हेमंत चारठाणकर यांनी गायले या कार्यक्रमासाठी माया महाजन यांनी निवेदकांची काम पाहिले मंगळागौरी कार्यक्रमात स्मिता दीक्षित, सुनिता काळे, प्रणिता कुलकर्णी, सीमा मोदी, मनीषा देशपांडे, अनुराधा जोशी, मंजुश्री ब्रह्मपूरकर, सुवर्णा सोन्नेकर आदी महिलांनी सहभाग नोंदवला तर सासु-सुनेच्या फुगडीत शोभा पडळकर व रेणुका पडळकर यांनी उत्साहात आणि बाई पण भारी या थीमची सादरीकरण केले.



# चांद्रयान ३ यशस्वी मोहिमेबद्दल आनंदोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतानं अखेर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरवण्याचा मान पटकावला आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरवणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्था म्हणजेच इस्त्रोच्या शास्त्रज्ञांच्या कष्टाचं सो नं झालं आहे. चांद्रयान २ मोहिमेत अंतिम टप्प्यात आलेलं अपयश चांद्रयान ३ च्या माध्यमातून पुसून काढण्यात आलं आहे. त्यामुळे श्री साई पॉलिटेक्नीक चंद्रपूर च्या वतीने हे यश आनंदोत्सव म्हणून साजरा करतात आला. भारतीय यान यशस्वीपणे चंद्रावर उतरवण्याचा महत्त्वाचा टप्पा आज संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी पार पडला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ यान उतरवणारा भारत पहिला देश ठरला. चांद्रयानाचं लँडिंग यशस्वी होणारच असा ठाम विश्वास भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्त्रो) व्यक्त केला होता तो खरा करुन दाखवला आहे. इस्त्रोनं सतीश धवन प्रक्षेपण केंद्र श्रीहरी कोटा येथून १४ जुलै रोजी चांद्रयान ३ चे प्रक्षेपण केलं होतं. त्यानंतर आज म्हणजेच २३ ऑगस्टपर्यंत प्रत्येक पातळीवर भारताला यश मिळालं होतं. यावेळी भारतानं ऑर्बिटर न पाठवता प्रॉपल्शन मॉड्यूल पाठवलं होतं. त्यामध्ये देखील अपेक्षेपेक्षा जास्त इंधन शिल्लक राहिले. या इंधनाचा उपयोग करून हे मॉड्यूल चंद्राभोवती पुढील किमान सहा महिने फिरत राहून पृथ्वीचा अभ्यास करेल.






# फुलंब्री तालुक्यात लम्पी आजाराचे थैमान

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** फुलंब्री तालुक्यातील राजंणगाव येथे लंम्पी आजाराने थैमान घातले असून हजारो जनावरे याच्या चपाटयात येण्याची भिती शेतकऱ्यांना वाटत आहे. विशेष म्हणजे पशू वैद्यकीय अधिकारी यांचे इकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. देशात पशुपालन मोठ्या शेतकरी वर्गाचे उत्पन्नाचे साधन आहे. मात्र त्यावर सध्या लम्पी नावाच्या संसर्गजन्य रोगाने ग्रहण लावले आहे. राजंणगाव, ता. फुलंब्री येथे लम्पी त्वचा आजाराने थैमान घातले आहे. येथे काही दिवसा पूर्वी लम्पी आजार रोखण्यासाठी लसीकरण मोहीम राबविण्यात आली होती. त्यानंतर ही येथे या त्वचा रोग ग्रस्त होत आहे. या ठिकाणी जनावरे दगावने सुरु झाली आहे. मात्र या दगावलेल्या जनावराची पशु संवर्धन विभाग यांच्याकडून दखल घेण्यात आली नाही. लम्पी



आजाराचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात उपाययोजना तसेच लसीकरण करण्यात येत आहे. सध्या लंपीचा संसर्ग एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पसरत असल्याचे चित्र दिसत आहे. या आजारामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या आजारामुळे जानावरांच्या शरिराला गाठी येतात, हा व्हायरस खुप वेगाने पसरत आहे. या आजारात राजस्थान, यूपी, बिहीर, मध्य प्रदेश, आणि महाराष्ट्रात पसरला आहे. या व्हयरसची लक्षणे लागण झाल्यानंतर काही दिवसांनंतर दिसून येतात.

> रांजणगाव येथे जवळपास १ हजार जरशी गाई ( दुधाळ जनावरे ) आहेत . प्रत्येक गाय लाखो रुपये खर्चून खरेदी केली आहे . अशा जनावरांना हा आजार आल्याने शेतकऱ्यांना भिती वाटत आहे . पशु संवर्धन विभाग मात्र निद्रास्त अवस्थेत आहे . तर लशीकरण करून ही आजार पसरत असल्याने अनेक शंका निर्माण होत आहे .
>
> **कल्याण जाधव, शेतकरी रांजणगाव**

हा त्वचाचा रोग आहे. यामुळे जनावरांच्या शरिराला गाठी येतात आणि पुढे त्या गाठींचा आकार मोठी होतो.

हा व्हायरस जास्त वेगाने दुसऱ्या जनावरांमध्ये संक्रमीत होतो. सांगितल जात आहे, की हा आजार मच्छरा चावल्यामुळे होतो. लंपी व्हायरसची लक्षणे लंपी या आजाराच्या लक्षणांमध्ये प्रथम जनावरांना ताप येतो. त्यांचे वजन कमी होते, जनावरांच्या डोळ्यातून चिकट पाणी टिपकते, तोंडातून लाळ पडते, शरिरावर छोट्या गाठी यायला लागतात.

जानावर दूध कमी देते, यामुळे जनावरांची तब्येत जास्त खराब होते.

लंपी व्हायरसवर उपाय लंपीची लागण झालेल्या जनानरांना वेगळे ठेवणे हा उपाय आहे. माश्या, डास, गोचीड यांना मारून टाकणे गरजेचे आहे. जनावराचा मृत्यु झाल्यास मृतदेह मोकळ्या जागेवर न सोडता पुरून टाकावा किवा जाळून टाकावा. परंतु रांजणगाव येथे जनावर दगावले परंतु तशी काळजी पशु संवर्धन विभाग यांनी घेतली नाही. संपूर्ण गोठ्यात कीटकनाशक फैरावे. या व्हायरसची लागन झालेल्या जनावरांचा मृत्यु होत असल्याने शेतकऱ्यात भिती निर्माण झाली आहे. या आजारामुळे देशभरात 57 हजारांहून अधिक जनावरांचा मृत्यू झाला आहे. देशात अनेक राज्यांमध्ये लंपी स्कीनचा कहर वाढत चालला आहे. देशात 15 राज्यांत 175 जिल्ह्यांमध्ये लम्पी स्कीन आजाराचा प्रादुर्भाव झाला आहे. 15 लाखांहून अधिक गायींना या आजाराची लागण झाली आहे.

## गुटखा तस्करांवर ‘मोक्का’ लावणार : मंत्री आत्राम

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** वारंवार एकच व्यक्ती गुटखा तस्करीत आढळून आल्यास ‘मोक्का’ची कारवाई करण्याचा इशारा अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेत आयोजित पत्रकार परिषदेत दिला. औषधी, तेल, खाद्यपदार्थात भेसळ होत असल्याचे आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल, यात कुणीची गय केली जाणार नाही, असेही आत्राम म्हणाले. लोकांच्या कल्याणासाठी महायुतीचे सरकार राज्यात काम करीत आहे. राज्यात गुटखा बंदी असतानाही वाहतूक करून विक्री होत आहे. आतापर्यंत ५० कोटी रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला, असे आत्राम यांनी सांगितले. दुधात होणारी भेसळ रोखण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचे मीटर आले आहे. त्याचाही वापर करण्यात येणार आहे. अन्न व औषध प्रशासन विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. ही पदे लवकरच भरण्यात येणार आहे. ऑनलाईन औषध विक्रीवर बंदी टाकण्यात येणार आहे. पोलिओ मुक्तीच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू आहे. आता बुस्टर डोसही देण्यात येणार आहे, अशी माहितीही आत्राम यांनी दिली. यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मजबूत करण्यात येईल.

## एका हातात छत्री दुसऱ्या हातात एसटी बसचे ‘स्टिअरिंग’!

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** पावसाळी अधिवेशनादरम्यान गडचिरोली-चामोर्शी मार्गावर अर्धवट छप्पर उडालेल्या अवस्थेत धावणाऱ्या बसची चित्रफीत सार्वत्रिक झाल्याने सरकारवर टीकेची झोड उठविण्यात आली होती.



आत पुन्हा अहेरी आगाराच्या एका बसची चित्रफीत सार्वत्रिक झाली असून यात पाऊस सुरू असताना चालक एका हातात छत्री आणि दुसऱ्या हातात बसचे ‘स्टिअरिंग’ घेत जीवघेणा प्रवास करीत असल्याचे दिसून येत आहे. ही चित्रफीत समाज माध्यमावर सार्वत्रिक झाल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी ट्विट करून राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे ‘लालपरी’ ही ‘जलपरी’ झाल्याची खोचक टीका केली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील राज्य परिवहन मंडळाच्या गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. त्यात दक्षिण भागात तर खराब रस्त्यांमुळे नागरिकांना बसने प्रवास नकोसा झाला आहे. गाड्यांची अवस्था बघता तात्काळ सुधारणेची गरज आहे. परंतु प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांना लालपरितून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे चित्र आहे. काही दिवसांपूर्वी अर्धवट छप्पर उडालेल्या अवस्थेत धावणाऱ्या बसची चित्रफीत सार्वत्रिक झाली होती.

त्याप्रकरणी एका अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले होते. आता पुन्हा एक चित्रफीत सार्वत्रिक झाली असून यात चालक एका हातात छत्री आणि दुसऱ्या हातात बसचे ‘स्टिअरिंग’ घेत जीवघेणा प्रवास करीत असल्याचे दिसून येत आहे. यावर आमदार रोहित पवार यांनी ट्विट करून ‘राज्यभरात सामान्य प्रवाशाची ‘लालपरी’ सरकारच्या दुर्लक्षामुळे ‘जलपरी’ झालीय. हे ‘सामान्यांचे सरकार’ आहे असं भासवणाऱ्या सरकारला मात्र सामान्य माणसांविषयी काहीही देणंघेणं नसल्याचंच यातून सिद्ध होते. आता मविआ आघाडी सरकारच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांच्या नावे राजकारण करणाऱ्यांना ही गळणारी बस दिसेल काय? असा प्रश्न उपस्थित केला आहे. याविषयी अहेरी आगाराच्या अधिकाऱ्यांना संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.



## ब्रिलियंट इंग्लिश स्कूल देणार संविधान परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** विद्यार्थ्यांना संविधानाचे ज्ञान मिळण्यासाठी संविधानाची परीक्षा महत्वपूर्ण असून या स्पर्धेत ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूलकडून चांगला सहभाग देणार असल्याचे संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात यांनी म्हटले आहे.यावेळी दादासो धायगुडे व संविधान गुणगौरव समितीचे सदस्य सुशिल गायकवाड उपस्थित होते. जयकुमार खरात यांनी प्रास्ताविक मनोगतातून संविधान परीक्षेचे महत्त्व समजावून सांगितले. समता, स्वातंत्र्य बंधुता, लोकशाही मनामनात रुजली पाहिजे. असेही जयकुमार खरात यांनी म्हटले. सैनिक या कवितेतून सैनिकाचे वर्णन मांडले.

रक्षित सामाजिक संस्था अंतर्गत स्थापित संविधान गुण गौरव समिती यांच्या वतीने लेखक नुरखाँ पठाण लिखित आपले संविधान राज्यपद्धती नव्हे तर जीवन पद्धती या पुस्तकाच्या आधारे राज्यस्तरीय गुणगौरव परीक्षा-२०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेत ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज खंडाळा बावडा येथील विद्यार्थ्यांसह शाळेचे गुरुजनवर्ग तसेच शाळेचे प्रमुख सुद्धा सहभागी होणार आहेत. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन सागर घाडगे यांच्या कडून करण्यात आले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी या संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या उद्देशिका प्रत शाळेस व संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात, प्राचार्या सुदर्शना जाधव, उपप्राचार्या स्वाती ढमाळ, उपशिक्षिका संध्या मोरे, रुपाली ढमाळ, रेश्मा भोसले, नाजनिन शेख, स्वाती कोंडे, मिनल गाढवे,

पूजा पडगीलवार, माधवी बडदे, उषा पवार, वैष्णवी पवार, सागर घाडगे आदींना देण्यात आल्या.

संविधान गुण गौरव समितीचे सदस्य सुशिल गायकवाड यांनी संविधान गुण गौरव परीक्षेची रूपरेषा समजावून सांगितली. तसेच विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारताना उत्तरे जाणून घेतली. विद्यार्थी शाळेच्या नावाप्रमाणे ब्रिलियंटच असल्याचे पाहायला मिळाले. संविधान हा आपला श्वास आहे. संविधान हे आपले सर्वस्व आहे.

संविधानामुळेच आपल्याला हक्क आणि अधिकार मिळत आहेत. आपल्याला संविधानाचं ज्ञान असणं अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय दशेतच परीक्षेच्या माध्यमातून संविधानाचे ज्ञान देण्याचा प्रयत्न हा संविधान गुण गौरव समिती कडून करण्यात येत असल्याचे सुशिल गायकवाड यांनी म्हटले. गायनातून त्यांनी संविधान गीत सादर केले. दादासो धायगुडे म्हणाले की,संविधान असल्यामुळे आज देशात महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. हा अभिमान वाटतो. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू होऊ शकतात हे केवळ संविधानामुळे शक्य आहे. यावेळी आभार संध्या मोरे यांनी मानले. संविधान गुण गौरव समितीचे अध्यक्ष विलास पवार, उपाध्यक्ष शबनम पठाण, मार्गदर्शक नुरखाँ पठाण,सदस्य अझहर शहा, नितीन घोपे, दिपरत्न निलंगेकर, युवराज खोब्रागडे, किशोर चव्हाण, सुशिल गायकवाड आदी परीक्षेचे नियोजन करत असून ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सहभागाबद्दल समितीने आभार मानले आहेत.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर